



रायगड, मंगळवार, दि. १९ मार्च २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## होळीच्या दिवशी वर्षातील पहिलं चंद्रग्रहण

**मुंबई :** तब्बल १०० वर्षांनंतर होळीच्या दिवशी चंद्रग्रहण असणार आहे. यावर्षी होळी २५ मार्च २०२४ ला असणार असून, या दिवशी चंद्रग्रहण सकाळी १०.२३ ते दुपारी ०३.०२ वाजेपर्यंत असणार आहे. हे चंद्रग्रहण भारतात दिसणार नाही. वर्षातील हे पहिलं चंद्रग्रहण असणार आहे. तर, या वर्षातलं पहिलं सूर्यग्रहण होळी पौर्णिमेनंतर पंधरा दिवसांनी म्हणजेच फाल्गुन अमावस्येला असणार आहे. पंचांगानुसार फाल्गुन अमावस्या ८ एप्रिलला असणार आहे. हे सूर्यग्रहण ९ वाजून १२ मिनिटांपासून पहाटे २ वाजून २२ मिनिटांपर्यंत असणार आहे. तेसुद्धा भारतात दिसणार नाही.






### आजचा अग्रलेख

**सुरुवात चांगली झाली**

## वेधक

### इक्बाल सिंह चहलना आयुक्तपदावरुन हटवले

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दणका दिला आहे. आयोगाने मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बाल सिंह चहल यांना महापालिकेच्या आयुक्तपदावरून हटविण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर इक्बाल सिंह चहल यांची बदली करण्यात आली आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांच्यादेखील बदलीचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त इकबालसिंह चहल यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ संपला तरी त्यांची बदली झाली नव्हती.

### भाजप-मनसे युती होणार?

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे दिल्लीला रवाना झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. विशेष म्हणजे, राज ठाकरे यांची ही दुसरी दिल्लीवारी आहे. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हेसुद्धा सध्या दिल्लीत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज ठाकरे यांची सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत बैठक होण्याची शक्यता आहे. या बैठकीत मनसे-भाजप युतीबाबत अंतिम निर्णय होण्याची चिन्हं आहेत. मागच्या काही दिवसांपासून भाजप आणि मनसे युती होईल, अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### मराठा बांधवांची राजकीय नेत्यांना गावबंदी

**मुंबई :** सर्वपक्षीय नेते झाले बहिरे, आमची मागणी सगेसोयरे अशा घोषणा देत लिमला तालुका पूर्णा येथील मराठा बांधवांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेत्यांना आणि त्यांच्या समर्थकांना घरबंदी अशा आशयाचे पोस्टर्स दाखवत घोषणाबाजी केली. यावेळी परिसरामधील ३०-३५ गावातील तरुणांना पोस्टर्स वाटप करण्यात आले. आता हे पोस्टर्स गाव गावाच्या दरवाजावर प्रथम दर्शी भागावर लावण्यात येणार आहेत. त्यामुळे एकीकडे लोकसभेचा निवडणूक प्रचार सुरू होत असतानाच दुसरीकडे मात्र मराठा बांधव गावोगावी या नेत्यांची नाकाबंदी करताना दिसत आहे.

## प्रशासकीय राजवटीमुळे कामे रखडली

# गावं गेली खड्ड्यात

**खड्डेमय रस्त्यांमुळे विकासाला ब्रेक**

**प्रमोद जाधव**

**। अलिबाग ।**

**रायगड जिल्हा परिषदेवर गेल्या दोन वर्षापासून प्रशासकीय राज आहे. अधिकाऱ्यांमार्फत गावांचा विकास होईल, अशी आशा जिल्ह्यातील नागरिकांना होती. मात्र, गावे-वाड्यांतील नागरिकांची घोर निराशा जिल्हा परिषद प्रशासनाने केल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यातील दोन हजार ५०० किलोमीटरचे रस्ते आजही खड्ड्यात आहेत. या खड्डेमय रस्त्यांमुळे गावांच्या विकासाला ब्रेक लागल्याचे बोलले जात आहे.**

रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित एक हजार ९०० वाड्यांचा समावेश असून, ग्रामीण भागाची लोकसंख्या सुमारे १६ लाख इतकी आहे. गावांतील रस्त्यांची लांबी पाच हजार ५०० किलोमीटर असून, जिल्ह्यातील दोन हजार ५०० किलो मीटरचे रस्ते खराब झाले आहेत. अतिवृष्टीमुळे हे रस्ते खराब




> अडीच हजार किलोमीटरचे रस्ते खराब झाले आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, पावसाळ्यापूर्वी रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे केली जातील.
> – पी. राऊत, कार्यकारी अभियंता, जि.प.

झाल्याची माहिती समोर येत आहे.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून गावांचा विकास केला जातो. गावांमध्ये रस्ते व अन्य सुविधा राबविल्या जातात. मात्र, खराब

> मागील दोन वर्षांपासून रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आलेली नाहीत. परिणामी, जनतेला खड्डेमय रस्त्यातून वाट काढावी लागत आहे. निधी मंजूर असतानाही कामे होत नाहीत, यामुळे जनतेमध्ये तीव्र संताप आहे. लवकरात लवकर रस्त्यांची कामे हाती घेण्यात यावीत.
> – जयवंत तांबटकर, सामाजिक कार्यकर्ते

झालेल्या अडीच हजार किलोमीटरच्या रस्त्यांची दुरूस्ती केली नसल्याने गावांच्या विकासावर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. गावांपर्यंत जाण्यासाठी खड्डेमय रस्ते असल्याने प्रवास करताना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खड्डेमय रस्त्यामुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामविकास विभागाकडून सुमारे १४ कोटी रुपयांचा निधी जिल्ह्यासाठी •➤ पान २ वर

# माढ्याच्या जागेवर शेकापचा दावा

## मविआकडे अनिकेत देशमुखांच्या उमेदवारीची मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षानं महाविकास आघाडीकडं माढ्याच्या जागेवर दावा केला आहे. या मतदारसंघातून गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. अनिकेत देशमुख यांना खासदारकीची उमेदवारी जाहीर करावी, अशी मागणी शेकापचे नेते जयंत पाटील यांनी केली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.



शरद पवारांच्या भेटीनंतर जयंत पाटील म्हणाले, माढा मतदारसंघात मी गेलो होतो, तिथल्या जागेवर आमच्या शेकापनं दावा केला आहे. या ठिकाणी गणपतराव देशमुखांचे नातू डॉ. अनिकेत देशमुख यांच्या उमेदवारीची मागणी आम्ही केली आहे. काल मी माढ्यातील काही प्रमुख नेत्यांबरोबर चर्चा केली, त्यानंतर महाविकास आघाडीसमोर आमची मागणी ठेवली आहे. पहिल्यापासून आमचा हा आग्रह आहे की, जागेपेक्षा महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून येणं महत्त्वाचं आहे. यासाठी आमचं थोडंफार नुकसान झालं किंवा एखादी जागा मिळाली नाही तरी चालेल.

पण महाविकास आघाडी एकत्र येऊन महाराष्ट्रात सध्या जे वातावरण तयार झालं आहे त्याला तडा जाऊ नये, हा आमचा प्रयत्न आहे. अनिकेत देशमुख हे डॉक्टर आहेत, विशेषतः त्यांची प्रतिमा चांगली आहे. विधानसभेला ते केवळ ४०० मतांनी पडले होते. त्यांच्यामागे गणपतराव देशमुखांचं नाव आहे. आमची जवळपास दीड लाख मतं माढा मतदारसंघात आहेत. पण, यावर एकमत झालं पाहिजे यासाठी मी प्रयत्न करतो आहे. •➤ पान २ वर

# लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार

- **मतदान न करण्याचा चाणजे ग्रामस्थांचा निर्धार**
- **शासनाच्या हलगर्जीपणामुळे शेती नापीक झाल्याचा आरोप**

**। उरण । वार्ताहर ।**

देशभरात लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून, नेतेमंडळींकडून मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर आतापासूनच भर दिला जात आहे. एकीकडे मतदानाचा टक्का वाढवा यासाठी प्रशासन कामाला लागले असताना, दुसरीकडे उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील चाणजे येथील अडीचशेहून अधिक एकर शेतजमीन शासनाच्या हजलगर्गीपणामुळे बाधित झाल्याचा आरोप करीत शंभरहून अधिक कुटुंबांनी आगामी लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकीवर एकमताने बहिष्कार टाकून मतदान न करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात रविवार, दि. १७ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता हनुमान मंदिर कोंढरीपाडा येथे सभा आयोजित केली होती. •➤ पान २ वर

> शासनाच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांची पिकती जमीन आज कवडीमोल झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये याबाबत तीव्र संताप आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत मतदान न करण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे.
> – अविनाश म्हात्रे, अध्यक्ष, चाणजे शेतकरी संघर्ष समिती



## 'मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणार'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मराठा आरक्षण आंदोलनावेळी दाखल करण्यात आलेले अदखलपात्र गुन्हे मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. अदखलपात्र गुन्हे ज्यामध्ये कोणतीही मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांकडून मालमत्ता आणि जीवितहानी झालेली नाही असे गुन्हे आम्ही मागे घेण्याचा निर्णय आम्ही आचारसंहिता लागण्यापूर्वीच घेतला आहे. याची प्रक्रिया प्रशासकीय पातळीवर सुरू झालेली आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांचा मराठा •➤ पान २ वर

# भटक्या कुत्र्यांचे होणार निर्बिजीकरण

- **रायगड जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाचा उपक्रम**
- **नाविन्य उपक्रम राबविणारी महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद**



**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकजण जखमी झाले आहेत. त्यामुळे भीतीचे वातावरण पसरू लागले आहे. यावर ठोस उपाय म्हणून रायगड जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने पुढाकार घेतला आहे. ग्रामीण भागातील चेंढरे, थळ व चौलमधील २०७ मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया व श्वानदंश प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले असून, ही मोहीम जिल्ह्यात राबविली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शाम कदम यांनी दिली. रायगड जिल्ह्यामध्ये •➤ पान २ वर

## अल्पवयीन मुलीचा मृतदेह आढळला

**। महाड । वार्ताहर ।**

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीचा मृतदेह पंख्याला लटकलेला आढळला आहे. सदरची घटना बिरवाडी-काळीज येथे सकाळी उघडकीस आली. रजनी सोनू शर्मा (१६, रा. काळीज-खरवली, मूळ, रा. उत्तरप्रदेश) असे मृत अल्पवयीन मुलीचे नाव आहे. याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी महाड ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. अधिक तपास सपोनि मारुती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उपनिरीक्षक जगदीश गायकवाड करत आहेत.

# एसबीआयची पुन्हा खरडपट्टी




**सर्वोच्च न्यायालयाने घेतले फैलावर**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

निवडणूक रोख्यांच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयाने आज पुन्हा एकदा स्टेट बँक ऑफ इंडियाची (एसबीआय) खरडपट्टी काढली. सोमवारी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने एसबीआयला चांगलेच फैलावर घेतले. निवडणूक रोख्यांबाबत लपवाछपवी करू नका. सर्व माहिती तीन दिवसांमध्ये सार्वजनिक करा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयला दिले.

सोमवारी निवडणूक रोख्यांबाबत सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठासमोर पुन्हा सुनावणी झाली. या सुनावणीवेळी न्यायालयाने निवडणूक रोख्यांबाबत काहीही लपवाछपवी करू नका असे एसबीआयला खडसावले. न्यायालयाने एसबीआयच्या चेअरमनला गुरुवार (२१ मार्च) सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्व माहिती सार्वजनिक करण्यास सांगितले आहे. यासाठी एक प्रतिज्ञापत्रही देण्यास सांगितले. तसेच एसबीआयकडून मिळालेली माहिती निवडणूक आयोगाने तात्काळ आपल्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी, असे निर्देशही न्यायालयाने दिले.

निवडणूक रोख्यांचा सर्व तपशील सार्वजनिक करावा, असे निकालपत्रामध्ये स्पष्ट करण्यात आले होते. यातील काहीही निवडक नसावे, असेही स्पष्ट करण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येक बाबतीत न्यायालयाच्या निर्देशांवर अवलंबून राहू नका. निवडणूक रोख्यांची सर्व माहिती उघड करणे बंधनकारक आहे. एसबीआय सर्वोच्च •➤ पान २ वर

## 'यासारखा नालायक माणूस नाही'

**श्रीनिवास पवार यांची टीका**

**। पुणे । प्रतिनिधी ।**



पंचवीस वर्षे मंत्री केले, चार वेळा उपमुख्यमंत्री केले तरीसुद्धा काकांनी माझ्यासाठी काय केले असे म्हणायचे! पुढच्या काही वर्षांत दुसऱ्या व्यक्तींकडून आपल्याला लाभ मिळणार आहे म्हणून वय झालेल्या व्यक्तीची आपण किंमत करत नाही. यासारखा नालायक माणूस नाही, अशा जळजळीत शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर त्यांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांनी टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर शरद पवार आणि अजित पवार या दोन गटांमुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांबरोबरच पवार कुटुंबियांतही द्विधा मनःस्थिती होती. असे असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बंधू •➤ पान २ वर

# सहा वर्षांपूर्वीच्या हत्येचा उलगडा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

चाकूने वार करून सहा वर्षांपूर्वी मृतावस्थेत नाल्यात टाकून दिलेल्या जयेश खुडेच्या खुनाचा गुन्हा अखेर उघडकीस आणण्यात रायगड •➤ पान २ वर

**आरोपी दुसऱ्या गुन्ह्यात महिनाभर कारागृहात**

**जयेशच्या खुनानंतर आरोपी ओमकारविरोधात गंभीर दुखापत केल्याप्रकरणी दुसरा गुन्हा दाखल झाला होता. त्यामुळे तो एक महिनाभर या गुन्ह्याबाबत कारागृहात होता. त्यामुळे पोलिसांना जयेशच्या खुन्याचा शोध घेता आला नाही. गेली सहा वर्षांपासून पोलीस त्याच्या शोधात होते. अखेर खबऱ्यांकडून माहिती मिळाल्यावर जयेशचा खून करणारा ओमकार पोलिसांना सापडला.**






## जिल्ह्यातील ३०० एसटी बस झाल्या जाहिरातमुक्त

# सरकारचा उदो उदो करणाऱ्या जाहिराती हटवल्या

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता शनिवारी १६ मार्च रोजी दुपारनंतर लागू झाली. प्रशासकीय विभागांनी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरून, होर्डिंग्ज, फलकावरुन राजकीय नेत्यांची छायाचित्रे काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील सुमारे ३०० एसटी बसेसवरील सरकारचा उदो उदो करणाऱ्या आणि नेत्यांची छायाचित्रे असलेल्या योजनांच्या जाहिराती हटवण्यात आल्या आहेत.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ७ मार्च रोजी



(संग्रहीत छायाचित्र)

पत्रक काढून मंत्रालय, प्रशासकीय विभाग आणि विभागीय, जिल्हा तसेच तालुका स्तरावर कार्यरत असलेल्या विविध विभागाच्या कार्यालयात नेत्यांच्या तसबिरी काढण्याचे फर्माने सोडलेले आहे. अजूनपर्यंत अनेक विभागातील नेत्यांच्या तसबिरी, विकासकामांच्या उद्घाटनाचे नामफलक झाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरु झालेले नाही, हे वास्तव आहे. आचारसंहिता काळात आणि त्यानंतर पूर्ण प्रक्रिया होईस्तोवर तसबिरी कार्यालयात लावता येणार नाही, असे दिसून आल्यास अधिकारी घरी जाणार, असा दम भरण्यात आलेला आहे.

> आगारात ४५७ गाड्या आहेत. पैकी सुमारे ३०० गाड्यांवरील जाहिराती काढून टाकण्यात आल्या आहेत. सरकारच्या जाहिराती या ठराविक कालावधीसाठी आल्या होत्या. एखाद्या जाहिरातीची मुदत संपल्यावर तेथे नवीन योजनेची जाहिरात असायची. आता आचारसंहिता लागू झाल्याने सर्व जाहिराती काढून टाकण्यात आल्या आहेत.
> – दिपक घोड, पेण विभागीय नियंत्रक

लालपरी परिवहन महामंडळाची बस, मात्र जोरकसपणे राज्य शासनाची जाहिरात असलेले फलक घेऊन गावोगावी, शहरात जात असल्याचे चित्र आहे. रायगड जिल्हा एसटी आगारात ४५७ बसेस आहेत. पैकी किमान ३०० बसेसवर गतिमान सरकारच्या ४९ विभागांच्या जाहिराती झळकत असल्याचे सर्वांनी पाहिले असेलच. साध्या गाड्या आणि हिरकणी गाड्यांवर सरकारच्या जाहिराती झळकत होत्या. मात्र, शिवशाही आणि एशियाड गाड्यांवर जाहिराती नव्हत्या.

# फिरत्या वाहनावर ध्वनीक्षेपकास निर्बंध

## ■ सकाळी ६ वाजण्यापूर्वी, रात्री १० नंतर वाजवण्यास बंदी

**। रायगड । खास प्रतिनिधी।**

**निवडणुकीच्या प्रचार मोहिमेच्या कालावधीत आता प्रचार करताना निवडणूक आयोगाने निर्बंध घातले आहेत. सकाळी सहा वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजल्यानंतर ध्वनीक्षेपक वाजवल्यास कारवाई बडगा उगारण्यात येणार आहे.**



सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून मोठ्या आवाजात प्रचार करण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे ध्वनी प्रदूषण होणे, सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील शांततेस व स्वास्थ्यास बाधा पोहोचण्याची व उशीरा रात्रीपर्यंत ध्वनीक्षेपक यंत्रणा चालू ठेवण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (एन) मधील प्राप्त अधिकारानुसार निवडणुकीच्या प्रचारासाठी ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंधाबाबतचे आदेश जारी केले आहेत.

निवडणुकीच्या प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचा वापराबाबतचे निर्बंध हे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ६ जून २०१४ पर्यंत अंमलात राहणार आहेत.

### ध्वनीक्षेपकाच्या वापरावर कोणते आहेत निर्बंध

**ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकारी यांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, ध्वनीक्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चीत ठिकाणी ध्वनी क्षेपकाच्या वापरा संबंधीत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हा दंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.**

# प्रचार साहित्यावर मुद्रक, प्रकाशकांचे नाव छापणे बंधनकारक

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणूक आदर्श आचारसंहिता काळात संबंधित मुद्रक प्रिंटर्सनी प्रचार साहित्य तसेच, इतर छपाईबाबत विशेष काळजी घेऊन आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना सहा महिन्यांपर्यंत कारावास किंवा दोन हजारांपर्यंत दंडाची अथवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतात, अशी तरतूद या नियमात असल्याचेही जिल्हाधिकारी जावळे यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील प्रिंटर, प्रकाशक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांसह जिल्ह्यातील मुद्रक उपस्थित होते.

या बैठकीत लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १२७ क व्दारे निवडणूक पत्रकांच्या छपाईवर आणि प्रसिद्धीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. याकडे सर्व राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार आणि मुद्रणालयांच्या चालक व मालकांचे लक्ष वेधण्यात आले आहे. हाताने नक्कल काढण्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रक्रियेने छापण्यात किंवा अनेक प्रती काढण्यात आलेले निवडणुकी संबंधीचे प्रत्येक पत्र, हस्तपत्रक, घोषणाफलक किंवा भित्तीपत्रक यांच्या दर्शनी भागावर मुद्रकांचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. असे कोणतेही पत्रक मुद्रकांने इच्छुक प्रकाशकाकडून त्यांनी ते स्वत: स्वाक्षरीत केलेले आहे, त्या व्यक्तिला व्यक्तिश: ओळखतील अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेल्या त्या प्रकाशकांची ओळख पटवणारे प्रतिज्ञापत्र (दोन प्रतीमध्ये) घेणे अत्यावश्यक आहे, असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले. तसेच दस्तऐवज छापण्यात आल्यावर मुद्रकाने प्रतिज्ञापत्राची एक प्रत व पत्रक आदींच्या चार प्रती संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे तीन दिवसांच्या आत सादर कराव्यात. या सर्व प्रती मीडिया सेलमधील कक्षात जमा करणे बंधणकारक आहे.

# जनरल अरुणकुमार वैद्य यांचे तैलचित्र लावणार : घार्गे

**। अलिबाग । वार्ताहर ।**

भारताचे माजी लष्करप्रमुख तथा अलिबागचे सुपुत्र जनरल अरुणकुमार वैद्य यांनी सेवाकाळात खलिस्तानची देशविघातक चळवळ नेस्तनाबूत केल्यामुळे ते अतिरेक्यांकडून दि. १० ऑगस्ट १९८६ रोजी शहीद झाले. त्यांचे तैलचित्र पोलीस अधीक्षक कार्यालयाशेजारील संरक्षक कठडावजा भिंतीवर लावण्यात येईल, असे आश्वासन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले. याबाबत ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर यांनी सूचना केली होती.

आंतरराष्ट्रीय महिलादिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उत्तुंग कामागिरी केलेल्या महिलांची तैलचित्रे ज्या ठिकाणी लावली आहेत, त्या ठिकाणी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून काही वीरपुरुषांची तैलचित्रे लावली जातील तेथे शहीद जनरल अरुणकुमार वैद्य यांचे तैलचित्र असेल, असेही घार्गे यांनी सांगितले.

# कांदळवने मच्छी प्रजननासाठी वरदान

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यातील राजापुरी खाडीचा रहाटाड हा एक महत्त्वाचा जैविक परिसर आहे, येथील खाजण वन हे अनेक सागरी जीवांचे आधार आहेत. मान्सूनपूर्व पाऊस सुरू झाला की, या खाजण क्षेत्रातील कुजलेल्या पानांवर जाळीसारख्या पसरलेल्या मुळांमध्ये विविध प्रकारचे मासे, कोलंबी, खेकडे, शंख, बोईट, जिताडा इत्यादी माशांचे प्रकार प्रजाननाच्या वेळी जून-जुलै महिन्यात येत असतात. त्या ठिकाणी त्यांचे संवर्धन व संरक्षण चांगल्या प्रकारे होत असते. काही माशांच्या प्रजाती कमी होऊन या भागात नष्टच होतात की काय, असा प्रश्न निर्माण होऊन संकट ओढवण्याची भीती कोळी बांधव व तज्ज्ञ मंडळी वर्तवत आहेत.



२०१४-१५ या वर्षात वनविभागामार्फत रहाटाड येथील दुर्लक्षित कांदळवनांच्या भागात लक्ष घालून माणगाव वन परिक्षेत्रातील तळा तालुक्यातील रहाटाड येथील खाजण क्षेत्रात ७५ हजार हेक्टर क्षेत्रात डुंबी, चिपी, खारफुटी, तीवर इत्यादी प्रकारच्या रोपांची लागवड केली होती. त्याचबरोबर पूर्वीचेही वृक्ष होते. आज हे क्षेत्र हिरवेगार दिसत असून, वृक्षांची चांगल्या प्रकारे वाढ झाली आहे. हे खाजण वनक्षेत्र चांगल्या प्रकारे वाढ झाली असल्याने प्रजानन काळात विविध माशांना अंडी घालण्यासाठी चांगल्या प्रकारचे क्षेत्र निर्माण झाले आहे. त्यामुळे माशांच्या प्रजाती वाढून या भागातील खाडी क्षेत्रात मच्छीत वाढ होऊन कोळी बांधवांना याचा फायदा होणार आहे.

# अलिबागमध्ये शासन मान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग

**। अलिबाग । वार्ताहर ।**




रायगड जिल्हा ग्रंथालय संघातर्फे आणि सार्वजनिक वाचनालय अलिबाग यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ष २०२४ दि. १ एप्रिल ते दि. ३१ मे या दोन महिन्यांच्या कालावधीत अलिबाग येथील जे.एस.एम. महाविद्यालय अलिबाग येथे होणार आहे. या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाचे शैक्षणिक पात्रता एस.एस.सी. पास आहे.

तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गात सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बौंदार्डे आणि सार्वजनिक वाचनालय जिल्हा ग्रंथालय अलिबागचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी केले आहे.

या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाच्या माहितीकरिता या वर्गाचे वर्ग व्यवस्थापक आणि सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय अलिबागचे (डोंगरे हॉल) ग्रंथपाल भालचंद्र वर्तक (९९२१५५१९५२) आणि रायगड जिल्हा रायगड ग्रंथालय संघाच्या प्रमुख प्रमुख कार्यवाह जिजा घरत (उरण-रायगड) (९८१९१९०७२३) यांच्याशी संपर्क साधावा. या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाचे प्रवेशाची शेवटची तारीख ३१ मार्च असल्याचे आयोजकांकडून कळविण्यात आले आहे.

पान १ वरून

## गावं गेली खड्ड्यात

मंजूर केला आहे. जिल्हा परिषदेकडून त्याची निविदाही काढण्यात आली आहे. पावसाळ्यापूर्वी ही कामे करण्याचा नियोजन जिल्हा परिषदेने केले आहे. मात्र, लोकसभा निवडणुकीत ही कामे मुदतीत होतील का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार

या सभेला शेकडो शेतकरी उपस्थित होते.

उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील चाणजे येथे सुमारे १०० हून अधिक कुटुंब शेतकऱ्यांच्या २५० एकर जमिनीवर खारफुटीचे अतिक्रमण झाले आहे. शिवाय, शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनीचा इतिहास न पाहता सीआरझेडमध्ये दाखविल्याने स्वतःच्या मालकीची शेती असूनसुद्धा शेतकरी (मालक) ही जमीन कोणाला विकू शकत नाही, तसेच या क्षेत्रात कोणतेही पीक घेऊ शकत नाही. अशा गंभीर समस्यांमध्ये अडकलेल्या शेतकऱ्यांच्या या महत्त्वाच्या समस्येकडे लोकप्रतिनिधींसह सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी तसेच महाराष्ट्र शासनाने नेहमी दुर्लक्ष केले आहे. परिणामी, स्वतःच्या मालकीची शेती असूनही येथील शेतकरी स्वतःच्या मूलभूत न्याय्य हक्कापासून वंचित राहिला आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून हनुमान मंदिर, कोंढरीपाडा-करंजा येथे एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत चाणजे शेतकऱ्यांच्या कोणत्याही समस्या न सुटल्याने येणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीवर एकमताने बहिष्कार टाकून निवडणुकीत मतदान न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या ५० ते ६० वर्षांपूर्वी चाणजे खाडीतील शेतजमिनीवर मोठ्या प्रमाणात भातशेती केली जात होती, परंतु कालांतराने बंदिस्त तुटत गेल्यामुळे समुद्राचे पाणी मोठ्या प्रमाणात शेतीत येऊ लागले. परिणामी, येथील शेतजमिनीत खारफुटीचे अतिक्रमण होत गेले. अनेक वृक्षांचे, कांदळवनाचे शेतात अतिक्रमण झाले.अशा प्रकारे चाणजे येथील शेतजमीन समुद्राच्या पाण्याखाली आणि खारफुटीखाली गेली. चाणजे येथील शेतजमिनीचा इतिहास न पाहता आत्ताच्या परिस्थितीचा विचार करून सरकारी यंत्रणा व उच्च न्यायालयाकडून पिकती भातशेतीची जमीन सीआरझेड व खारफुटीत दाखवण्यात आली आहे. परिणामी, ७/१२ उताऱ्यावर शेतकऱ्यांची नावे (भातशेती पीक) असलेली शेतजमीन ना पिकवू शकत, ना विकू शकत, अशी शून्य मोल झाली आहे. शासनाच्या हलगर्जीपणामुळे येथील शेतजमिनी नापीक झाल्या आहेत, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दरम्यान, आजतागायत येथील शेतजमीनीचे अस्तित्व टिकवण्यासाठी व शेतकऱ्यांना एवढ्या गंभीर समस्येतून न्याय देण्यासाठी येथील लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतलेला नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे या विषयाच्या अनुषंगाने जोपर्यंत येथील बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत येणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीवर चाणजे येथील बाधित शेतकऱ्यांद्वारे बहिष्कार टाकण्याचे ठरले आहे, अशी माहिती चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी दिली. या सभेस चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे, सेक्रेटरी निशिकांत म्हात्रे, खजिनदार नितीन म्हात्रे, परशुराम थळी, कृष्णा पाटील, रुपेश म्हात्रे,सुरेश थवई, धर्मेंद्र ठाकूर, अनिकेत ठाकूर, गणेश म्हात्रे, चैतन्य थळी, मंगेश म्हात्रे आणि इतर शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एसबीआयची पुन्हा खरडपट्टी

न्यायालयाच्या निर्णयास बांधील आहे. त्यामुळे तुम्ही सर्व माहिती उघड का केली नाही? असा संतप्त सवाल सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी एसबीआयला केला.

एसबीआयकडून सारवासारव करताना ज्येष्ठ वकील हरीश साळवे म्हणाले की, आम्हाला समजल्याप्रमाणे आम्ही निकालाचे पालन केले आणि सर्व माहिती उघड करण्यासाठी वेळ मागितला होता. मात्र यावर समाधान न झाल्याने सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड नाराजी व्यक्त केली. सर्व माहिती सार्वजनिक न केल्याने आम्ही गेल्या सुनावणीत एसबीआयला नोटीस बजावली होती. एसबीआयने रोखे क्रमांक जाहीर केलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन एसबीआयने करावे. निवडणूक आयोगाला सर्व निवडणूक रोख्यांचा युनिक नंबर म्हणजे अल्फा न्यूमेरिक नंबर द्यावा, असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले.

## माढाच्या जागेवर शेकापचा दावा

जरी आमच्या बाजूनं निर्णय झाला नाही, तरी मी महाविकास आघाडीसोबत आणि इंडिया आघाडीसोबत राहणार आहोत. महाविकास आघाडी स्थापन झाली तेव्हा महाराष्ट्रात गेल्या खेपेला आमचं नुकसान झालं. आमच्या उमेदवारांचा विश्वासघात केला गेला. ते लोक आता सोडून गेलेले आहेत, त्यामुळं आमची मविआकडं तक्रार नाही.

## ‘मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणार’

आरक्षणासाठी लढा अद्याप सुरू आहे. येत्या २४ तारखेला बैठक होणार असल्याचं जरांगेंनी सांगितलं आहे. या बैठकीत आम्ही आमची पुढची दिशा ठरवणार आहे. या बैठकीला सर्व तज्ज्ञ हजर राहणार आहेत. समाजाकडून दोन दिवस तिथे जेवणाची सुद्धा व्यवस्था केली आहे. जी प्रचंड मोठी बैठक असणार आणि निर्णायक बैठक असणार आहे. आचारसंहिता लागण्याच्या अगोदर निर्णय घेणार होते, मात्र घेतला नाही. २४ तारखेला अंतिम बैठक आणि अंतिम निर्णय मराठा समाजाचा असेल, असाही इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

## भटक्या कुत्र्यांचे होणार निर्बिजीकरण

ग्रामीण भागात ठिकठिकाणी कुत्र्यांचा झुंड दिसून येतो. अनेक वेळा हे कुत्रे माणसांवर एकत्रित हल्ले करीत असतात. त्यामुळे जीव गमविण्याची भीती अधिक असते. काही वेळा दुचाकीवरून प्रवास करीत असताना कुत्रे अंगावर आल्याने अपघात होण्याची भीतीदेखील असते. गावे, वाड्यांमध्ये कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, स्थानिक प्रशासनाकडून त्यांच्यावर ठोस कारवाई केली जात नसल्याने नागरिकांना, विशेष करून लहान मुलांना दहशतीच्या खाली राहावे लागत आहे. जानेवारी २०२२ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत चार हजार १७६ जणांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केल्याची माहिती उपलब्ध झाली असून, एक हजार २०४ जणांना उपचारासाठी दाखल केले आहे. तर, दोन हजार ९७२ जणांवर बाह्य रुग्ण कक्षात उपचार केल्याची माहिती जिल्हा रुग्णालयाकडून देण्यात आली आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम हाती घेतला आहे. यासाठी जिल्हा परिषदेकडून २५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. पुणे येथील युनिर्वसल ॲनिमल वेलफेअर या एजन्सीला हे काम देण्यात आले आहे. २५ फेब्रुवारीपासून या कामाला सुरूवात केली आहे. यासाठी पेणमध्ये एक सेंटर उभारण्यात आले आहे. मोकाट कुत्र्यांना पकडणे, त्यांना त्या सेंटरमध्ये आणणे, निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया करणे, त्यांची उत्पत्ती थांबविण्यासाठी व रेबीजपासून बचाव करण्यासाठी श्वान दंश प्रतिबंधित लसीकरण देण्याचे काम सुरु केले आहे.

ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येनुसार कुत्र्यांचे निर्बिजीकरण केले जाणार आहे. त्यासाठी सुरुवातीली अलिबाग तालुक्यातील चेंढरे, चौल व थळ ग्रामपंचायतीची निवड केली आहे. आतापर्यंत २०७ कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण करण्यात आले आहे. सध्या चौलमध्ये हे काम सुरु असल्याचे सांगण्यात आले आहे.

**शहरातील कुत्र्यांवर ही होणार कारवाई**

**अलिबाग शहरात ठिकठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. पादचाऱ्यांसह दुचाकी चालकांना या कुत्र्यांचा त्रास अनेकवेळा झाला आहे. मोकाट कुत्र्यांच्या दहशतीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. मात्र, अलिबाग नगरपरिषदेमार्फतदेखील या कुत्र्यांवर आता कारवाई केली जाणार आहे. कुत्र्यांवर कारवाई करण्यासाठी पाचवेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. अखेर पुन्हा निविदा मागविण्यात आली होती. पुणे येथील युनिर्वसल ॲनिमल वेल्फेअर संस्थेची निविदा मंजूर करण्यात आली आहे. शहरातील मोकाट कुत्र्याच्या निर्बिजीकरणाचे काम सुरु करण्यात आले असल्याची माहिती अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक अंगाई साळुंखे यांनी दिली.**

## सहा वर्षांपूर्वीच्या हत्येचा उलगडा

पोलिसांना यश आले आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड व रसायनी पोलिसांनी खुन्याचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले आहे. हा खून पैसे न दिल्याच्या वादावरून झाल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, त्याच्यावर चाळीस खुनाचे वार झाल्याने ही माहिती न पटण्यासारखी असल्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली आहे. त्यामुळे अधिक तपास करून नक्की खून करण्याचे कारण शोधण्याचे काम युद्धपातळीवर असल्याचे ते म्हणाले.

जयेश १० एप्रिल २०१८ ला घरातून कामानिमित्त बाहेर गेला होता. तो परत आलाच नाही. शोधाशोध करूनही त्याचा तपास न लागल्याने, अखेर कुटुंबियांनी ११ एप्रिलला रसायनी पोलीस ठाण्यात हरविल्याची तक्रार दाखल केली होती. रसायनी येथी मोहपाडा परिसरात चावणे ते पेट्रो नॉस कंपनीकडे जाणाऱ्या एका नाल्यात १३ एप्रिल २०१८ रोजी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास जयेशचा मृतदेह सापडला होता. त्याच्या छातीवर चाकूने वार केलेल्या जखमा आढळून आल्या होत्या. पोलिसांनी हत्या करणाऱ्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. परंतु, काही तपास लागला नव्हता.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी उघडकीस न आलेल्या जुन्या खुनांची उकल करण्यासाठी पथक तयार केले. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकासह रसायनी पोलीसदेखील कामाला लागले. रसायनी पोलीस ठाण्याच्या एका कर्मचाऱ्याला खबऱ्यांमार्फत माहिती मिळाली. पोलिसांनी त्यानुसार दोघांना ताब्यात घेतले. त्यातील एकजण कल्याणमध्ये रिअल इस्टेटमध्ये काम करणारा, तर दुसरा सॉफ्टवेअर इंजिनिअर होता. पोलिसी दणका मिळाल्यावर दोघेही बोलके झाले. सहा वर्षांपूर्वी रात्री जयेश चालत जात होता. त्याला दुचाकीवर लिफ्ट दिली होती. मात्र, त्याने पैसे न दिल्याने त्याच्यावर चाकूने वार करून ठार केल्याची कबुली त्यांनी दिली.

**दोघेही खालापूरमधील रहिवासी**

**ओमकार शिंदे व रोहित पाटील अशी आरोपींची नावे आहेत. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमण, सहाय्यक फौजदार राजेश पाटील, प्रसाद पाटील, पोलीस हवालदार यशवंत झेमसे, संदीप पाटील, राकेश पाटील, सुधीर मोरे यांनी यांनी आपले कौशल्यपणाला लावून या दोघांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. अखेर या दोघांना ताब्यात घेण्यात आले. ओमकार हा खालापूरमधील वावंढळ व रोहित हा चांभार्ली येथील रहिवासी आहे. रोहितला अहमदनगर जिल्ह्यातून ताब्यात घेतले आहे.**

## यासारखा नालायक माणूस नाही

श्रीनिवास पवार आणि त्यांच्या पत्नी शर्मिला पवार यांनीही ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. बारामती तालुक्यातील काटेवाडी या पवारांच्या गावात ग्रामस्थांबरोबर एक बैठक पा र पडली. या बैठकीला श्रीनिवास पवार यांनी मार्गदर्शन केले. श्रीनिवास पवार म्हणाले, की पवार साहेबांचे वय ८३ झाले आहे. या वयात त्यांना सोडणे मला पटले नाही. मला काही व्यक्ती म्हणाल्या, इथून पुढची वर्षे दादांची आहेत, साहेबांची नाही. हा विचार मला वेदना देऊन गेला. भाजपने पवार साहेबांना संपवण्याचा खूप प्रयत्न केला. घरातला कुणीतरी फोडल्याशिवाय ते घर संपत नाही. हा इतिहास आहे. घर एक असेल, तर ते संपवू शकत नाही. वय वाढले म्हणून तुम्ही वयस्कर माणसाला कमजोर समजू नका.

# सद्यःस्थितीत पत्रकारांनी अधिक सजग होण्याची गरज : खा. कोल्हे




**। चिंचवड । प्रतिनिधी ।**

लोकशाहीची मूल्ये टिकवून ठेवण्यासाठी चौथ्या स्तंभाची भूमिका मोलाची असून, सद्यः परिस्थितीत पत्रकारांनी अधिक सजग होण्याची खरी गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिध्द अभिनेते, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी चिंचवड येथे केले. चिंचवड येथे शनिवार, दि. १६ मार्च रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई आणि पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय अधिवेशनाच्या समारोप झाला. यावेळी ते बोलत होते.

दरम्यान, पत्रकारांनी बरं नव्हे तर खरं लिहिले पाहिजे, असे सांगुन पत्रकार कोणत्याही पक्ष विचारांचा नसतो तो फक्त बातमीचा असतो, असे स्पष्टीकरण प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी अध्यक्षीय समारोपात केले. याप्रसंगी सलग पाच वर्षे जिल्हाध्यक्षपदाची धुरा सांभाळून विविध उपक्रम यशस्वी केल्याबद्दल तसेच निर्भिड उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ रायगड जिल्हा अध्यक्ष शैलेश पालकर यांना प्रदान करण्यात आला. यावेळी खालापूर तालुक्यातील मोहोपाडा येथील पत्रकार राकेश खराडे यांना रायगड जिल्हा उपाध्यक्षपदाची नियुक्ती जाहीर करीत सन्मानित करण्यात आले.

प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली दोन सत्रात झालेल्या अधिवेशन समारोपला खासदार अमोल कोल्हे, माजी मंत्री, आमदार बच्चूभाऊ कडू, आमदार महेश लांडगे आदी मान्यवरांची उपस्थिती झाला. उद्घाटन सकाळी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, ज्येष्ठ लेखक अरविंद जगताप, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले, महेश म्हात्रे, मंदार फणसे, आशिष जाधव, प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, उपाध्यक्ष नितीन शिंदे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पराग कुंकुलोळ, यांच्या उपस्थितीत झाले. समारोपात कामगारांचे लढवय्ये नेते तथा ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव, भोसरी मतदार संघाचे महेश लांडगे, शिरूर मतदारसंघाचे खासदार डॉ.अमोल कोल्हे, आ. उमा खापरे, राजकीय विश्लेषक उदय निरगुडकर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, चेतन भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# माझेरी रस्त्याला मुहूर्त कधी?

## ■ अनेक वर्षे डागडुजी न झाल्याने रस्ता खड्डेमय



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

**मुरुड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील माझेरी रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली आहे. साळाव-आगरदांडा रस्त्याला मुहूर्त मिळाला असून, त्यामुळे माझेरी रस्त्याला मुहूर्त कधी, असा प्रश्न विचारला जात आहे.**

मुरुड-आगरदांडा व रोहाला जाण्यासाठी माझेरी रस्ता हा जवळचा असल्याने या मार्गे अनेक गाड्या रोजच्या रोज ये-जा करीत असतात; परंतु गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याने ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. हा रस्ता जागोजागी खड्डेमय झाल्याने लोकांना व वाहन चालकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता डोंगरीवरून माझेरी ते खोकरीपर्यंत खराब झाला आहे. निदान रस्त्याला पडलेले खड्डे तरी बुजवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.

सदरचा रस्ता खड्डेमय असूनसुद्धा लोकप्रतिनिधी या रस्त्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे. तरी या रस्त्याला कोणी वाली आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ग्रामस्थ नवाब कुरेशी यांनी सांगितले की, हा रस्ता नव्याने बनला नाही. डोंगरी रस्त्यापासून माझेरी व खोकरी या बाहेरील रस्त्यावर जागोजागी अनेक खड्डे पडले आहेत.

जी परिस्थिती साळाव-आगरदांडा रस्त्याची होती, तीच या रस्त्याची आहे. साळाव-आगरदांडा रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली आहे. आता लोकप्रतिनिधींनी या रस्त्याकडे लक्ष देऊन हा रस्ताही खड्डेमुक्त करावा, अशी मागणी नवाब कुरेशी यांनी केली आहे.

निवडक

## रोटरीकडून महिलांचा सन्मान

**रसायनी :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा आयोजित स्त्री शक्ती पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. हा एक अनोखा आणि विलक्षण उत्सव होता ज्याने महिलांच्या कर्तृत्वाचे प्रतीक एकत्र केले. आरोग्यसेवा, शिक्षण, आदरातिथ्य, पर्यटन, फॅशन, मीडिया, मनोरंजन, वित्त, रिटेल, उत्पादन, स्वयंसेवी संस्था, उद्योजकता इत्यादी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## मतदान जनजागृती कार्यक्रम

**उरण :** भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वीप उपक्रमाअंतर्गत इक्रा हायस्कूलमध्ये मतदान जनजागृतीचा कार्यक्रम संपन्न झाला. कोणत्याही अमिषाला बळी न पडता निर्भयपणे आपण मतदानाचा अधिकार बजवायला हवा. मेरा व्होट मेरी पहचान अशी ओळख लोकशाहीच्या सर्वात मोठ्या सणात म्हणजे निवडणुकीत मतदाराने करायला हवी अशा प्रकारची जनजागृती करण्यात आली. यावेळी हायस्कूलचे १६० हून अधिक पालक उपस्थित होते.

## निबंध स्पर्धेत प्रथमेश प्रथम

**खोपोली :** कराडमधील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्सच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत खोपो-लीतील के. एम. सी. महाविद्यालयाच्या प्रथमेश धायगुडे याने प्रथम क्रमांक पटकावला. याच महाविद्यालयाची निकिता भदे हिने उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवले. प्रथमेशला रोख रक्कम रु. ५०००, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक तर निकिता भदे हिला रोख रक्कम रु. १०००, प्रशस्तीपत्रक बक्षिस स्वरूपात मिळाले आहे.

## बेलापूर येथे रक्तदान शिबीर

**पनवेल :** भवानी फाऊंडेशनच्या माध्यमातून बेलापूरमध्ये झालेल्या रक्तदान शिबिरात १२७ नागरिकांनी रक्तदान केले. प्रत्येकाने सेवाभाव जपावा, रक्तदात्यांमुळे अनेक रुग्णांचे जीव वाचविणे शक्य होते. त्यामुळे नागरिकांनी रक्तदानाच्या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी डॉ.सुनील कुट्टी, राजेश पौल, राजेश गुप्ता, राजेश सरोज, सत्यबाबू नायडू, सुनील सुतार, नवीन शेट्टी, राजलक्ष्मी आलाटे आदी उपस्थित होते.

## सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**पनवेल :** उत्कृष्ट ज्येष्ठ महिला मंडळाच्या वतीने नेरूळ येथील ज्येष्ठ नागरिक भवन येथे एकपात्री, द्विपात्री अभिवाचन, जोगवा, भारूड, आधुनिक रामायण, मालवणी स्टॅन्ड अप कॉमेडीचा कार्यक्रम रंगला होता. अध्यक्षा स्वाती फडके यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम पार पडला. अश्विनी देशपांडे, नेत्रा शिर्के, सुरेखा इथापे यांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाची प्रशंसा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघा बमनकर यांनी तर मुग्धा करंदीकर यांनी आभार मानले.

# शेतीच्या पाणी प्रश्नावर सिंचन विहिरींचा उतारा

सुयोग आंग्रे

। रायगड ।

- रायगडात बांधणार १२ हजार ९० सिंचन विहिरी
- जिल्ह्यात प्रत्येक ग्राम पंचायतीत १५ सिंचन विहिरी बांधणार
- एका विहिरींसाठी मिळणार ४ लाख रुपये अनुदान

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला कमीत कमी १५ किंवा त्यापेक्षा जास्त सिंचन विहिरी बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये असणाऱ्या ८०६ ग्रामपंचायतींमध्ये १२ हजार ९० सिंचन विहिरी बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. यापैकी १३२१ सिंचन विहिरी बांधून पूर्ण झाल्या आहेत. १० हजार ७६९ सिंचन विहिरी बांधण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सिंचन प्रकल्पावर अवलंबून न राहता वैयक्तीक स्तरावर सिंचनाचे स्रोत शेतकऱ्यांकडे असावेत आणि सिंचनाबाबत शेतकरी स्वयंपूर्ण व्हावा यासाठी मनरेगातून या विहिरी घेण्यात येणार आहेत.

अलिबाग तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींमध्ये ९३० सिंचन विहिरी, कर्जत ५५ ग्रामपंचायतींमध्ये ८२५ विहिरी, खालापूर ४४ ग्रामपंचायतींमध्ये ६६० विहिरी, महाड १३४ ग्रामपंचायतींमध्ये २०१० विहिरी, माणगाव ७३ ग्रामपंचायतींमध्ये १०९५ विहिरी, म्हसळा ३९ ग्रामपंचायतींमध्ये ५८५ विहिरी, मुरूड २४ ग्रामपंचायतींमध्ये ३६० विहिरी, पनवेल ६९ ग्रामपंचायतींमध्ये १०३५ विहिरी, पेण ६३ ग्रामपंचायतींमध्ये ९४५ विहिरी, पोलादपूर ४२ ग्रामपंचायतींमध्ये ६३० विहिरी, रोहा ६४ ग्रामपंचायतींमध्ये ९६० विहिरी, श्रीवर्धन ४३ ग्रामपंचायतींमध्ये ६४५ विहिरी, सुधागड ३४ ग्रामपंचायतींमध्ये ५१० विहिरी, तळा २५ ग्रामपंचायतींमध्ये ३७५ विहिरी आणि उरण तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींमध्ये ५२५ सिंचन विहिरी बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.



**अलिबाग तालुक्यात १८२ सिंचन विहिरी, कर्जत १०५ विहिरी, खालापूर ७८ विहिरी, महाड ८४ विहिरी, माणगाव ७५ विहिरी, म्हसळा ३४ विहिरी, मुरूड ६४ विहिरी, पनवेल ७५ विहिरी, पेण ११५ विहिरी, पोलादपूर २१४ विहिरी, रोहा ५१ विहिरी, श्रीवर्धन २४ विहिरी, सुधागड १४१ विहिरी, तळा ७६ विहिरी आणि उरण तालुक्यात ३ सिंचन विहिरी बांधण्यात आल्या आहेत.**

### हे असतील पात्र लाभार्थी

- शेतकरी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक
- जमीन किमान ४० गुंठे असावी.
- शेतकऱ्याकडे जॉबकार्ड असणे आवश्यक
- राष्ट्रीयीकृत बँक खात्याला आधार कार्ड लिंक असावे
- नवीन विहिरीसाठी जागा जुन्या विहिरीपासून ५०० फूट असावी.
- भूजल सर्वेक्षण दाखल्याची गरज नाही.

शेतकरी शेतात या योजनेचा लाभ घेऊन चांगल्या प्रकारचे उत्पन्न घेऊ शकतात तसेच या योजनेंतर्गत विहिरींच्या कामासाठी १०० दिवसांचा मनुष्यबळाचा खर्च केंद्रस्तरावर तर अतिरिक्त लागणारा दिवसाचा मनुष्यबळाचा खर्च राज्यस्तरावर देण्यात येणार आहे. या योजनेमुळे खरिपाबरोबरच रब्बी हंगामातही लागवडीला प्रोत्साहन मिळणार आहे. त्याचबरोबर केवळ पावसाच्या पाण्यावर चालणाऱ्या शेतीबरोबरच उन्हाळ्यातही सिंचनासाठी शेतकऱ्यांना पाण्याचे स्रोत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

रायगड जिल्ह्यात ८०६ ग्रामपंचायती आहेत. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये किमान १५ सिंचन विहिरी म्हणजेच १२ हजार ९० सिंचन विहिरींची खोदाई करता येणार आहे. त्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची कमतरता भासणार नाही. वैयक्तीक सिंचन विहीर खोदण्यासाठी ४ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. त्यासाठी हॉल्टिकल्चर ॲप विकसित करण्यात आले आहे. त्यावर नोंदणी करून शेताच्या बांधावरूनच शेतकरी सिंचन विहिरीची मागणी करू शकतात. सिंचन विहिरीसाठी किमान ४० गुंठे जागा असावी; मात्र, ४० गुंठ्यापेक्षा कमी क्षेत्र असेल तर शेजारील सलग क्षेत्र घेऊन संयुक्त सिंचन विहीर बांधण्याचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

## अलिबागमध्ये राष्ट्रीय अभिरूप न्यायालय स्पर्धा उत्साहात

**। अलिबाग । वार्ताहर ।**

ॲड. दत्ता पाटील विधी महाविद्यालय आणि अधिवक्ता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आंतर महाविद्यालयीन अभिरूप न्यायालय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याला महाविद्यालयांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

जिल्हा आणि सत्र मुख्य न्यायाधीश अजेय राजंदेकर यांच्या हस्ते व जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच अधिवक्ता परिषद रायगडचे अध्यक्ष ॲड. संतोष पवार आणि अधिवक्ता परिषद अलिबागचे अध्यक्ष ॲड. अमित देशमुख यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा पार पडला. विद्यार्थ्यांनी विधी शाखेचे शिक्षण घेत असताना जास्तीत जास्त मुटिंग, ड्राफ्टिंग आणि मौखिक कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन यावेळी अजेय राजंदेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. ॲड. गौतम पाटील यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, प्रसंगावधान इत्यादी कौशल्यांचा विकास करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. ॲड. संतोष पवार यांनी यावेळी अभिरूप न्यायालयाचे महत्त्व विशद केले. विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ॲड. नीलम हजारे यांनी आपले मत व्यक्त केले.

## अंगणवाड्यांच्या सक्षमीकरणावर भर

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, एकात्मिक बाल विकास योजना आणि ईस्क्रा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड विभागातील अंगणवाड्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये पोषण किट, आरोग्य निदान किट, मार्गदर्शन आदी विविध उपक्रमांचा समावेश आहे.

### २५०० कुटुंबांना पोषण किटचे वाटप

**सुधागड तालुक्यातील स्थलांतर लक्षात घेता पौष्टिक आहाराची जागृती लोकांमध्ये व्हावी या उद्देशाने व पोषण निर्देशांक वाढावा या हेतूने सुधागड तालुक्यातील २५०० कुटुंबांना पोषण किटचे वाटप करण्यात येणार आहे. या किट चे वितरण गरोदर माता, स्तनदा माता, सहा वर्षाच्या आतील मुले व सॅम व मॅम या कॅटेगरीतील मुले यांना करण्यात येणार असून उद्घाटन रंजना म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर संपूर्ण प्रकल्पासाठी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी आर्थिक सहाय्य करून सुधागड मधील अंगणवाडी सेविकांना सुदृढ करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्याच सोबत १५६ वाडीतील २५०० कुटुंबांना पोषण किट वाटण्यात आले.**

अंगणवाडी सक्षमीकरण कार्यक्रमामध्ये सर्वप्रथम १५६ अंगणवाडी सेविकांसाठी आरोग्य निदान किट याचे वाटप करण्यात आले. उपस्थित डॉक्टर यांनी या किटचा वापर कसा करावा. याबद्दल मार्गदर्शन केले. अंगणवाडी सेविकांची क्षमता बांधणी व्हावी, या हेतूने वेगवेगळ्या विषयांचे मार्गदर्शन त्यांना करण्यात येत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मुलांचे पहिले हजार दिवस, स्तनपान, आणि वॉश कार्यक्रम याचा समावेश आहे. यावेळी सुधागड तालुक्यातील सहा वर्षाच्या आतील मुले, गरोदर माता, स्तनदा माता यांच्यासाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरासाठी स्त्रीरोगतज्ञ डॉ. स्वप्ना दाहे, बालरोगतज्ञ डॉ. लेखराज तळमळे, डॉ. प्रकाश मोटे व न्यूट्रिशनिस्ट फाल्गुनी बोरकर उपस्थित होते. सदर उपक्रमात २०० पेक्षा अधिक लोकांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे सीएसआर प्रतिनिधी आदित्य सालेकर, गटविकास अधिकारी लता मोहिते, एकात्मिक बाल विकास योजना प्रकल्प अधिकारी रंजना म्हात्रे, इस्क्रा संस्थेचे अध्यक्ष अर्चना पाले आणि सचिव रामचंद्र आव्हाड हे उपस्थित होते.

## साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्याच्या डांबरीकरणाला वेग

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड-आगरदांडा रस्त्याच्या डांबरीकरण कामाला वेग आला असून रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल.असा विश्वास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूत्रांकडून व्यक्त केला जात आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून दुरवस्थेत असलेल्या साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्याच्या कामासाठी कोट्यावधीचा निधी मंजूर होऊन कामाला सुरुवात झाली आहे.या रस्त्यावर बोर्ली स्टॅण्ड व नांदगाव सुरळपेठ एस.बी.आय. एटीएम ते बेंगलोर बाजार दरम्यान पावसाळ्यात पावसाचे पाणी भरण्याची शक्यता लक्षात घेऊन काँक्रिटीकरण करण्यात आले. साळावपासून ते बारशिवपर्यंत डांबरीकरण पूर्ण होत आले आहे.



साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्याच्या अनेक वर्षांपासून असलेल्या दुरावस्थेमुळे वाहन चालक व प्रवासी वर्गाला त्रास सहन करावा लागत होता. या रस्त्याच्या डांबरीकरण कामाला सुरुवात होऊन साळाव पासून बारशिवपर्यंत डांबरीकरण पूर्ण होत आले असून लवकरात लवकर साळाव -मुरुड-आगरदांडा रस्त्याचे काम पूर्ण होईल, असा विश्वास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूत्रांकडून व्यक्त केला आहे.

## कळंबोलीत साकारणार ‘महाराष्ट्र हब’

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्याच्या उद्योग विभागाच्या वतीने कळंबोलीमध्ये सहा एकर भूखंडावर आधुनिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. यासाठी एक हजार ७०० कोटी रुपयांची मंजुरी राज्य सरकारने दिली आहे. या ठिकाणी पंचतारांकित हॉटेलसुद्धा साकारण्यात येणार आहे. यामुळे कळंबोलीसह पनवेल परिसराला एक वेगळे महत्त्व प्राप्त होणार आहे. या केंद्राच्या निविदा मागील महिन्यामध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूक होत आहे. तसेच राज्यातील वेगवेगळ्या एमआयडीसीमध्ये अनेक कारखाने येत आहेत. औद्योगिकदृष्ट्या प्रगतिपथावर असणाऱ्या महाराष्ट्रामध्ये कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने कळंबोलीमध्ये मोठे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. तीन वर्षांमध्ये हे काम पूर्णत्वास येणार आहे. सायन-पनवेल महामार्ग, यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गालगत ४८० क्रमांकाचा भूखंड आहे. राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणातून हा उपक्रम राबविला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य शिखर संस्था उभारण्याचे काम एमआयडीसी करत आहे.

### इन्क्युबेशन सेंटर इमारत

**उद्योग प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रकल्पाअंतर्गत इनक्युबेशन सेंटरच्या इमारतीचे क्षेत्रफळ ३९,१६०.७६ चौरस मीटर आहे. तसेच या केंद्रात प्रशिक्षणार्थ्यांसाठी १३,२६९.३८ चौरस मीटरच्या जागेवर निवासी इमारत बांधण्यात येणार आहे. या केंद्रात २६,३८५.०९ चौरस मीटर जागेवर माहिती व तंत्रज्ञान साहाय्यभूत सुविधेची इमारत उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाची अंदाजपत्रकीय रक्कम १,०५९.४१ कोटी असून वस्तू व सेवा कर तसेच इतर खर्चांसहीत या प्रकल्पासाठी एक हजार ७०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे.**

**उद्योग प्रशिक्षण केंद्राची अत्याधुनिक इमारत असेल, ज्यामध्ये ३०० विद्यार्थ्यांकरिता प्रशिक्षण सुविधा असणार आहे. तसेच त्यामध्ये विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांसाठी निवासाची व्यवस्था असणार आहे. स्टार्टअप्सना उत्तम तंत्रज्ञान, गुणवत्ता, व्यवसाय नेटवर्क आणि निधी मिळविण्याकरिता मदत करणे, हे या केंद्राचे उद्दिष्ट असणार आहे.**

## स्नेह महिला मेळावा संपन्न

**। खांब । प्रतिनिधी ।**

स्नेह ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळ कोलाड. येथे स्नेह महिला मेळावा उत्साहात संपन्न करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून संपन्न झालेल्या या मेळाव्यात मुख्य मार्गदर्शिका अनुराधा म्हात्रे, अविनाश म्हात्रे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व श्री गणेशाचे पूजन करून मेळाव्यास प्रारंभ करण्यात आला.

संचालिका प्रणिता गांधी यांनी मंगळ गीत गाऊन कार्यक्रमाची वातावरणात निर्मिती केली. मंडळाचे अध्यक्ष मारूती राऊत यांनी प्रास्ताविकपर भाषण केले. यावेळी अनुराधा म्हात्रे यांनी महिलांना संबोधित केले.

## राजपुरी समुद्रातील मासेमारी ठप्प



### नौका किनाऱ्यावर; कोळी बांधव हतबल

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील राजपुरी समुद्रतातील मासेमारी पश्चिमेकडून जोरदार वारे सुटत असल्याने ठप्प झाली आहे.त्यामुळे या परिसरातील सुमारे ८० नौका १५ दिवसांपासून किनाऱ्यावर नांगरण्यात आल्याची माहिती राजपुरी येथील ज्येष्ठ मच्छीमार धनंजय गिदी यांनी दिली.

या सिझनमध्ये राजपुरी खाडीतील सफेद जवळा, कोलंबी, पापलेट अशी मासळी मोठ्या प्रमाणात येत असते.परंतु आता साधा जवळादेखील पुरेसा मिळत नाही. जंजिरा जलदुर्गासमोरच राजपुरी गाव वसलेले असून येथे मच्छीमारी करणाऱ्या कोळी बांधवांचीदेखील मोठी लोकवस्ती आहे. मासळी मिळेल या अपेक्षेने काही नौका समुद्रात मच्छीमारीसाठी जात देखील असतात; परंतु समुद्रात जोरदारपणे वाहत असलेल्या वाऱ्यामुळे मासेमारी जाळी फाटतात किंवा वाहून जातात. मासळीदेखील खोल पाण्यात गेल्याने मिळत नाही. त्यामुळे मच्छीमारांचा डिझेल खर्चदेखील सुटत नाही. सफेद कोळीम थोड्या प्रमाणात मिळते. त्यावरच गुजराण करावी लागते अशी माहिती मच्छीमारांनी दिली.

एके काळी राजपुरी येथून बोंबील, सोलट कोलंबी, चैती कोलंबी, पापलेट, शेवंड, सुरमई, रावस आदी मासळी मुरूडच्या मार्केटमध्ये भरपूर प्रमाणात येत असे. परंतु गेल्या तीन चार वर्षांपासून राजपूरीच्या समुद्रात मिळणाऱ्या मासळीचे प्रमाण कमालीचे घटले असून छोटा जवळा (सफेद कोळीम) मासळीदेखील दुरापास्त झालेले दिसत आहे. त्यामुळे मच्छीमार आर्थिकदृष्ट्या कोलमडून गेलेले दिसून येत आहेत. ओला सफेद कोळीम मिळत नसल्याने कोळी महिलांना देखील सुकवून विक्रीसाठीचा आधारदेखील राहिलेला दिसत नाही. मुरूड परिसरातील ज्येष्ठ मंडळी सांगतात की, १५ ते २० वर्षांपूर्वी ताजी मासळी राजपुरी बंदरातून मिळत होती. दिवसेगणिक मासेमारी हळूहळू ठप्प होऊ लागली आहे.

## निवडणुकीमुळे परीक्षा लांबणीवर

**। अलिबाग । वार्ताहर ।**

निवडणुकांमुळे सनदी लेखापाल अभ्यासक्रमाच्या इंटर, फायनल आणि फाउंडेशन परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. निवडणुकांमुळे परीक्षांच्या तारखांमध्ये बदल शक्य असल्याची माहिती आयसीएआयकडून या पूर्वीच देण्यात आली होती. वेळापत्रकानुसार इंटरमिजिएट गट एकची परीक्षा ३, ५ आणि ७ मे रोजी होणार होती. गट दोनची परीक्षा ९, ११ आणि १३ मे रोजी होणार होती. सीए अंतिम गट एकची परीक्षा २, ४ आणि ६ मे रोजी, गट दोनची परीक्षा ८, १० आणि १२ मे रोजी घेण्यात येणार होती. आता या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

## रिक्षा चालक उतरले रेंट ॲन्ड बाईकच्या विरोधात

# पाच दुचाकी अलिबाग पोलिसांच्या ताब्यात


**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भाड्याने दुचाकी देण्याचा व्यवसाय बेकायदेशीर असतानादेखील तो अलिबागमध्ये खुलेआमपणे सुरु आहे. त्यामुळे रिक्षा व्यवसायिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यांच्याविरोधात रिक्षा चालक आक्रमक झाले असून त्यांनी या व्यवसायाविरोधात पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. भाड्याने दिलेल्या पाच दुचाकी अलिबागच्या रिक्षा चालक, मालकांनी अलिबाग पोलिसांच्या ताब्यात दिल्या आहे. यावर पोलीस काय कारवाई करणार,याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.



अलिबागसह अनेक ठिकाणी शहरात दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय सुरु आहे. या व्यवसायाला उपप्रादेशिक परिवहन विभागाने बेकायदेशीरचा शिक्का मोर्तब केला आहे. तरीदेखील हा व्यवसाय अलिबागसह अनेक भागात राजरोसपणे चालविला जात आहे. हा व्यवसाय चालविणाऱ्या चालकांविरोधात उपप्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई करीत नोटीस देखील बजावली आहे. तरीसुध्दा हा व्यवसाय खुलेआमपणे सुरु ठेवला जात आहे. दुचाकी भाड्याने देण्याच्या व्यवसायामुळे स्थानिक रिक्षा व्यवसाय आर्थिक संकटात सापडला आहे. त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.त्यामुळे उपासमारीची वेळ येण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय बंद करण्याची मागणी गेल्या अनेक महिन्यांपासून केली जात आहे. मात्र त्यांच्याविरोधात ठोस कारवाई केली जात नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

> दुचाकी भाड्याने चालविणे बेकायदेशीर आहे. हा व्यवसाय करणाऱ्यांना यापूर्वी परवानगी घेऊन दुचाकी भाड्याने देण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र तरीदेखील कोणतीही परवानागी न घेता तो व्यवसाय सुरु ठेवला. रिक्षा व्यवसायिकांवर त्याचा परिणाम होत आहे. सोमवारी रिक्षा चालकांनी पाच दुचाकी पकडून पोलीस ठाण्यात आणल्या. त्या जप्त केल्या आहेत. उपप्रादेशिक परिवहन विभागाला याबाबत पत्र व्यवहार केला असून त्यांच्याकडून पुढील कारवाई केली जाणार आहे.
>
> - संजय पाटील, पोलीस निरीक्षक, अलिबाग



# सुरुवात चांगली झाली

राहुल गांधी यांच्या न्याय यात्रेच्या समारोपाची मुंबईत झालेली सभा जोरदार झाली. लोकसभा निवडणुका जाहीर झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी इंडिया आघाडीतील पक्षांनी केलेल्या या शक्तीप्रदर्शनामुळे यंदाच्या प्रचाराची सुरुवात चांगली झाली. राहुल यांनी आधी कन्याकुमारी ते काश्मीर आणि नंतर मणिपूर ते मुंबई अशा ज्या दोन यात्रा काढल्या त्यामुळे देशात मोठी वातावरण निर्मिती झाली यात शंकाच नाही. दुसऱ्या यात्रेचा समारोप शिवाजी पार्कवर तिला साजेसा असाच होता. या सभेमध्ये फारूख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती यांच्यापासून ते द्रमुकचे स्टालीन यांच्यापर्यंतचे दक्षिणोत्तर अनेक विरोधी नेते आवर्जून हजर होते. महाराष्ट्रात इतर कोणत्याही प्रांतापेक्षा महाविकास आघाडीचा मिलाफ अधिक चांगला आहे. त्यामुळे शरद पवार व उद्धव ठाकरे हे सभेचे मुख्य वक्त्यांपैकी एक होते. या सर्वांची भाषणे आणि सभेतील प्रचंड गर्दीचा प्रतिसाद पाहता मोदी राजवटीला महाराष्ट्रात कडवी लढत द्यावी लागेल. उद्धव यांची सेना शिवाजी पार्कवर काँग्रेससोबत जात असल्याबद्दल एकनाथ शिंदे यांनी काल टीका केली होती. भाजपवाल्यांना सोईस्कर असले की बाळासाहेब आठवतात. त्याप्रमाणे त्यांनी ठाकरे यांचा काँग्रेसवर टीका करणारा जुना व्हिडिओ प्रसारित केला. या मुद्द्यावरून कडव्या शिवसैनिकांमध्ये आपण चलबिचल निर्माण करू शकू असे शिंदे व भाजपला वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे. भूतकाळात घेतलेल्या भूमिकांच्या आधारे आज टीकाच करायची असेल तर ती भाजपला सर्वाधिक लागू पडेल हे सर्वांना ठाऊक आहे. आज उठता बसता मोदींचे नाव घेणाऱ्या शिंदे यांनी २०१९ मध्ये जाहीर सभेमध्ये भाजपच्या दडपशाहीला कंटाळून आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्याचा व्हिडियो सर्वत्र उपलब्ध आहे. अजितदादा, नीतीश, चंद्राबाबू नायडू यांचे कधी तोंडही पाहणार नाही असे सांगणारे देवेंद्र किंवा अमित शाह यांचेही अनेक व्हिडिओ उपलब्ध आहेत. असे असताना उद्धव यांना दोष देण्यासाठी शिंदे किंवा भाजप यांना तोंड आहे काय?

### आंबेडकरांचा सहभाग

रविवारच्या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्यात प्रकाश आंबेडकर सहभागी झाले. वंचित बहुजन आघाडीला महाविकासमध्ये सामील करून घ्यायला हवे अशी भूमिका सातत्याने आम्ही मांडली आहे. मात्र मधल्या काळात प्रकाश आंबेडकर यांनी बरीच उलटसुलट विधाने केली. प्रत्येक वेळी नव्या मागण्या करणे, आमची २७ जागांची तयारी आहे असे म्हणणे इत्यादींमुळे त्यांच्या भूमिकेबद्दल संशय निर्माण झाला होता. पण आता शिवाजी पार्कवर दाखल होऊन त्यांनी सकारात्मक पाऊल टाकले असे म्हणायला हरकत नाही. आता महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही त्यांना सन्मानाने बोलावून लवकरात लवकर जागावाटप पूर्ण करायला हवे. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे नेते यांच्यात जागावाटपावरून रस्सीखेंच जरूर आहे. पण तुटण्यापर्यंत ताणायचे नाही हे या तिघांनीही ठरवलेले दिसते. त्यातच आता राजू शेट्टीनी उद्धव यांची भेट घेऊन इचलकरंजीमध्ये पाठिंबा देण्याची विनंती केली. शेट्टी आले तर आघाडीची ताकद आणखी वाढू शकेल. काँग्रेस वा राष्ट्रवादीसोबत मतभेद असले तरी मोदींच्या हुकुमशाहीविरुध्द एकत्र लढायला हवे ही गरज महाराष्ट्रातील अनेक नेते व संघटनांना मान्य झाली आहे. हे राज्य पुरोगामी परंपरा सांगणारे आहे. इथे धर्माच्या नावाने हुकुमशाही आणि इडीची जुलुमशाही सहन केली जाऊ शकणार नाही हा निर्धार या सर्वांनी गेल्या दोन वर्षात जोरदारपणे व्यक्त केला आहे. भाजप आणि मोदींना सर्वाधिक भीती त्याचीच वाटत आहे. त्यामुळे मोदी वारंवार इथे चकरा मारत आहेत. आघाडीतील नेत्यांना फोडणे चालू आहे. पण इडीची भीती घालून फोडलेल्यांकडून भाजपवाल्यांना निष्ठेची अपेक्षा करता येणार नाही. अशोक चव्हाण हे भाजपमध्ये जाण्यापूर्वी सोनिया गांधी यांना फोन करून कसे रडले याचा किस्सा रविवारच्या सभेत राहुल यांनी नाव न घेता सांगितला. हीच स्थिती शिवसेनेतून गेलेल्यांचीही आहे.

### जनतेत चीड

निवडणूक होईपर्यंत भाजप ही फोडाफोडी चालू ठेवणार हे उघड आहे. छत्तीसगडमध्ये मतदानाच्या दिवशीपर्यंत भूपेश बघेल यांच्या मित्रांवर छापे घालणे चालू होते. महाराष्ट्रातही हेच घडणार आहे. पण नेत्यांनी घाबरून पक्षांतर केले तरी जनता भाजपच्या मागे जाणार नाही. याच मुंबईतून एकेकाळी चलेजावचा नारा दिला गेला होता याची आठवण करून देऊन उद्धव, पवार व इतर सर्वांनीच काल भाजपलाही तोच इशारा दिला. ती जनतेचीच भावना आहे. निवडणूक रोख्यांमुळे मोदींचा भाजप भ्रष्टाचारात किती आरपार बुडाला आहे याचे चित्र समोर आले आहे. बेकारी व महागाईसारख्या प्रश्नांवर सरकारला तोडगा काढता आलेला नाही. काही ना काही भानगडी करूनच राज्य टिकवण्याची मोदींची खटपट चालू आहे. मोदींच्या गॅरंटीची आता टर उडवली जात आहे. तेजस्वी यांनी तर काल सांगितलेच की, नीतीश पुन्हा पलटी मारणार नाहीत याची गॅरंटी मोदी यांनी देऊन दाखवावी. इव्हीएम म्हणजेच मतदानयंत्रांमध्ये काही ना काही घोळ आहे अशी सर्वांनाच शंका आहे. राहुल यांनी तर मोदींचे प्राणच इव्हीएममध्ये अडकले आहेत असा प्रहार केला. याखेरीज, ज्या रीतीने देशातील बहुतांश संपत्ती अदानी आणि अंबानीसारख्यांच्या वाट्याला जात आहे त्याबद्दल लोकांची चीडही राहुल यांनी बोलून दाखवली. अग्निवीरसारख्या लष्करी सेनेचे कंत्राटीकरण करण्याच्या योजनेची पोल खोल केली. एकीकडे मोदी राममंदिर, काश्मीर वगैरे भावनिक विषय मांडत असताना इंडिया आघाडीचे नेते लोकांचे खरे प्रश्न मांडत आहेत व त्यांना नक्की प्रतिसाद मिळेल. २०१९ मध्ये राफेलचा मुद्दा जोर पकडत होता. मात्र त्याचवेळी पुलवामाचे प्रकरण घडले व तथाकथित सर्जिकल स्ट्राईक करण्यात आला. याहीवेळी असेच काहीतरी केले जाण्याचा धोका आहेच. पण आता जनतेलाही हे सर्व नाटक कळून चुकले असेल. प्रश्नांना उत्तरे देता आली नाहीत की लोकांना धर्माच्या किंवा राष्ट्रवादाच्या नशेत बुडवून टाकायचे हे डावपेच एकदा चालले. आता २०२४ मध्ये भारत बदलला आहे.

---

**विचार**

# ‘प्रचंड’ पुन्हा ड्रॅगनच्या कह्यात

**चीनला नेपाळमधील कम्युनिस्ट पक्षांची एकजूट आवडते. याउलट, भारत नेपाळी काँग्रेसला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सत्तेतील भागीदार म्हणून पाहू इच्छितो. नेपाळमध्ये सत्तेचे नवे समीकरण तयार झाल्यानंतर भारत आणि चीनचे शेजारी राष्ट्राबद्दलचे मत बदलू शकते. सुमारे १३ महिन्यांपूर्वी भारताला किमान एका सीमेवर तरी आशादायक वातावरण वाटत होते. आता मात्र तिथे चीनच्या कुरापती वाढण्याची शक्यता आहे.**



**डॉ. विजयकुमार पोटे**

भारताचा शेजारी असणारा नेपाळ पुन्हा एकदा चीनच्या आहारी चालला आहे. भूतान, पाकिस्तान, मालदीव, अफगाणिस्तान, इराण या देशांशी चीनने आधीपासूनच चांगले संबंध प्रस्थापित केले आहेत. भारताला शह देण्यासाठी पाकिस्तान आर्थिक आणि लष्करी ताकदीचा वापर करत असतो. सीपीईसी (चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक्स कॉरिडॉर)च्या विरोधात भारताने मध्य पूर्वेतून युरोपला जोडणाऱ्या नवीन कॉरिडॉरची घोषणा केल्यानंतर ड्रॅगनचे पित्त खवळले आहे. अशा परिस्थितीत तो भारताला त्रास देण्यासाठी शेजारी देशांचा वापर करतो आहे.

आधी नेपाळला भारतातून इंधनासह महत्त्वाच्या बाबींची निर्यात व्हायची. त्याच नेपाळला भारतापासून तोडण्यासाठी चीन प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. त्यासाठी चीनला तिथल्या कम्युनिस्ट पक्षाची मदत झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे चीनचा तिथला हस्तक्षेप इतका मोठा आहे की नेपाळचे परराष्ट्र मंत्रालय चीनच चालवत असल्यासारखी परिस्थिती असल्याचे आपण पाहू शकतो. सध्याचे वातावरण तरी तसेच दर्शवत आहे. नेपाळमध्ये पायाभूत सुविधांचे जाळे तयार करून त्या माध्यमातून भारताच्या सीमेपर्यंत जलद लष्करी हालचाली करण्याचा चीनचा सुप्त हेतू लपून राहिलेला नाही. मध्यंतरी नेपाळमधले सरकार भारताला अनुकूल भूमिका घेत होते. आता मात्र त्या सरकारच्या भूमिकेत बदल झाला आहे. नेपाळचे पंतप्रधान पुष्पकमल दहल प्रचंड यांनी पुन्हा एकदा आपली भूमिका बदलली असून त्यांच्या ‘कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ’ने नेपाळी काँग्रेससोबतची युती तोडली आणि नेपाळचे माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्या ‘कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ’शी (युनिफाइड मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) युती केली.

प्रचंड यांच्या या निर्णयामुळे नेपाळी संसदेत सर्वाधिक ८८ जागा जिंकणारा नेपाळी काँग्रेस पक्ष विरोधी पक्ष बनला आहे. प्रचंड आणि ओली यांच्या युतीमध्ये राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष (आरएसपी) आणि जनता समाजवादी पक्षाचाही समावेश आहे. प्रचंड यांनी त्यांच्या सर्व मंत्र्यांची हकालपट्टी केली होती आणि त्यांचा पक्ष, ओली यांचा पक्ष आणि ‘आरएसपी’मधून प्रत्येकी एक नवीन मंत्री समाविष्ट केला होता. आता प्रचंड यांनी उर्वरित सर्व २५ मंत्रालये स्वत:कडे ठेवली आहेत. नेपाळमध्ये २०२२ मध्ये पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत नेपाळी काँग्रेस आणि प्रचंड यांच्या ‘कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ’ (माओवादी केंद्र) मध्ये युती झाली होती. पण निवडणुकीनंतर प्रचंड यांनी ओली यांच्या ‘कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ’शी (युनिफाइड मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) युती केली.

प्रचंड यांचे भारताशी केवळ राजकीय नाहीत तर कौटुंबिक संबंध आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतही त्यांचे चांगले संबंध होते. काही महिन्यांपूर्वी नेपाळने भारताशी वीजपुरवठ्याचा करार केला आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्येच ओली यांच्या पक्षाने प्रचंड यांच्याशी असणारी युती तोडली. नेपाळच्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत प्रचंड यांच्या पक्षाने नेपाळी काँग्रेसचे नेते रामचंद्र पौडेल यांना पाठिंबा दिला होता. वास्तविक, राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत प्रचंड यांनी आपल्या पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा, अशी ओली यांची इच्छा होती. रामचंद्र पौडेल अध्यक्ष झाल्यानंतर नेपाळी काँग्रेसने प्रचंड यांच्याशी पुन्हा एकदा हातमिळवणी केली; पण जेमतेम एक वर्ष उलटले आणि प्रचंड नेपाळी काँग्रेसपासून दुरावले. सरकारमधील अनेक मुद्यांवर नेपाळी काँग्रेस आणि प्रचंड यांच्या पक्षातील मतभेद उघडपणे समोर येत होते. सर्वात मोठा वाद हा ‘नॅशनल असेंब्ली’च्या अध्यक्षांबाबत होता. नेपाळी काँग्रेसला ‘नॅशनल असेंब्ली’चे अध्यक्षपद प्रचंड यांच्या पक्षाकडे जाऊ द्यायचे नव्हते. कारण नेपाळच्या ‘नॅशनल असेंब्ली’चे अध्यक्षपद अत्यंत महत्त्वाचे पद आहे. या अध्यक्षांच्या शिफारशीनुसारच घटनात्मक संस्थांमधील सदस्यांच्या नियुक्त्या केल्या जातात.

नेपाळमध्ये १२ मार्च ही ‘नॅशनल असेंब्ली’च्या अध्यक्षपदासाठी निवडणूक तारीख आहे. अर्थात तिथे पुन्हा पुन्हा नवीन सरकार बनणे ही काही नवी बाब नाही. २००८ मध्ये नेपाळमधील राजेशाही संपुष्टात आल्यापासून आतापर्यंत अकरा सरकारे स्थापन झाली आहेत. नेपाळच्या निवडणूक व्यवस्थेत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळत नाही. त्यामुळे आघाडीचेच सरकार चालवावे लागते. नेपाळच्या २७५ सदस्यीय प्रतिनिधीगृहात १६५ सदस्य थेट जनतेद्वारे म्हणजेच त्यांच्या मतांद्वारे निवडले जातात तर उर्वरित ११० सदस्य प्रतिनिधित्व प्रक्रियेद्वारे निवडले जातात. २०१८ मध्ये ओली आणि प्रचंड यांनी नेपाळ कम्युनिस्ट पार्टीच्या रुपात एक मोठी कम्युनिस्ट शक्ती तयार करण्यासाठी पक्षांचे विलीनीकरण केले होते. परंतु दोघांमधील सत्तासंघर्ष इतका वाढला की २०२१ मध्ये ते पुन्हा वेगळे झाले आणि स्वाभाविकच नेपाळ कम्युनिस्ट पार्टीचे विघटन झाले. यानंतर दोघांनीही आपापले पक्ष स्थापन केले. चीनला नेपाळमधील कम्युनिस्ट पक्षांची एकजूट नेहमीच आवडते. याउलट, भारत मात्र नेपाळी काँग्रेसला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सत्तेत भागीदार म्हणून पाहू इच्छित आहे. नेपाळमध्ये सत्तेचे नवे समीकरण तयार झाल्यानंतर भारत आणि चीनचे शेजारी राष्ट्राबद्दलचे मत बदलू शकते. सुमारे १३ महिन्यांपूर्वी नेपाळी काँग्रेस आणि प्रचंड यांच्या पक्षातील युतीमुळे भारताला किमान एका सीमेवर तरी वातावरण आशादायक वाटत होते. आता मात्र चीनच्या कुरापती त्या भागातही वाढणार, यात शंका नाही.

डावे पक्ष एकत्र येणे चीनसाठी सोयीचे असते. मात्र कम्युनिस्टांचे वर्चस्व असणाऱ्या नव्या युतीची दिल्लीला चिंता आहे वाटणे स्वाभाविक आहे. त्यामुळे देशाच्या मूलभूत परराष्ट्र धोरणात बदल संभवत नाही; परंतु नेपाळबद्दलची धारणा नक्कीच बदलू शकते. नेपाळच्या राज्यघटनेने अलिप्तवादाचे परराष्ट्र धोरण स्वीकारले असल्याने सरकार बदलले तरी ‘संतुलित’ परराष्ट्र धोरण राखले जाईल, अशी अपेक्षा आहे. तथापि, हेही खरे आहे की, पूर्वी कम्युनिस्ट एकत्र आले तेव्हा चीनने सकारात्मक प्रतिसाद दिला. चीनसोबत ‘बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह’ (बीआरआय) कराराची अंमलबजावणी करणे नेपाळसाठी भविष्यातील प्राधान्य बनू शकते. गेल्या काही काळापासून काही गट नेपाळला पुन्हा हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी करत आहेत. नेपाळी काँग्रेसमधील एक गटही ही मागणी करत आहे. हिंदू राष्ट्राच्या अजेंड्यासह नवी युती तयार झाली तर काय होईल, असा प्रश्नही उपस्थित केला गेला आहे. भारताने नेपाळमधील हिंदू राष्ट्र किंवा संघराज्य वा प्रजासत्ताक यावरील चर्चेला औपचारिकपणे प्रतिसाद दिलेला नाही किंवा त्यात रसही घेतलेला नाही.

नेपाळमध्ये सत्ता बदलणे ही एक सामान्य बाब झाली आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून दीड वर्षांपेक्षा कमी कालावधीत सत्ताधारी आघाडीचे अधिकारी तीन वेळा बदलले गेले; पण संसदेतील तिसऱ्या शक्तीचे प्रमुख असलेले माओवादी पक्षाचे अध्यक्ष पुष्पकमल दहल ‘प्रचंड’ प्रत्येक वेळी पंतप्रधान होण्यात यशस्वी ठरले आहेत. मध्यंतरीच्या काळात त्यांनी भारतासोबतचे संबंध वाढवले आणि ऊर्जा व्यापाराबाबत एक महत्त्वाचा करारही केला तर ‘मिलेनियम चॅलेंज कॉर्पोरेशन’अंतर्गत अमेरिकेसोबतही एमसीसी नावाचा एक संक्षिप्त करार झाला. अर्थात सत्ताधारी आघाडीत वारंवार बदल होत असताना देशाच्या आत आणि बाहेरच्या विश्वासार्हतेत घट होणे क्रमप्राप्त असते. याच न्यायाने नेपाळमधील सत्तेसाठी सुरू असणारी चढाओढ बाहेरील शक्तींना तिथे हालचाली करण्यास प्रोत्साहित करेल. चीन आणि भारतासारख्या मोठ्या देशांमधील स्थानामुळे नेपाळचे भू-राजकारण अतिशय संवेदनशील मानले जाते. त्यामुळे इथल्या अस्थिरतेबद्दल बाहेर स्वारस्य आणि चिंता असणे समजण्यासारखे आहे. मात्र या अस्थिर परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय संबंधांच्या पातळीवर भारताचे नुकसान होत आहे, हे मात्र नक्की.

---

**आजकाल**

# ‘‘शेल’’ कंपन्यांमार्फत भानगडी कशा केल्या जातात?

**संजीव चांदोरकर**

निवडणूक रोख्यांच्या माहितीचा मर्यादित विस्फोट झाला आणि बऱ्याच चर्चा प्रिंट/सोशल मीडियामध्ये झाल्या/होत आहेत; त्याचे स्वागत करायला हवे.

अशासाठी कि त्या निमीत्ताने कॉर्पोरेट/वित्त भांडवलशाहीच्या चर्चा सार्वजनिक व्यासपीठांवर होतात आणि त्यातून काही प्रमाणात राजकीय शिक्षण होते. कॉर्पोरेट प्रणाली नक्की कशी चालते. विक्री/ नफा आणि देणग्या यांचा परस्पर संबंध काय इत्यादी

ज्यांनी निवडणूक रोखे खरेदी साठी मोठ्या देणग्या दिल्या, त्यांच्या कोठेतरी फालतू जागी असणाऱ्या रजिस्टर ऑफिसचे फोटो छापले गेले किंवा हजार कोटी देणगी दिलेल्या कंपनीची साधी वेबसाईट देखील नाही हे सांगितले गेले.

अनेक संज्ञा चर्चेत वापरल्या गेल्या आहेत; त्यातील एक आहे ‘‘शेल’’ कंपनी

‘‘शेल‘‘चा अर्थ टरफल. आत ‘‘दाणा‘‘ नसलेले पोकळ आवरण.

सर्वसाधारणत: माल-सेवांचे उत्पादन, वितरण, इत्यादींसाठी प्रवर्तक एखादी कंपनी स्थापतो; जमीन, इमारती, यंत्रसामुग्री, कार्यालय निर्माण करतो.

या विरूध्द शेल-कंपनी. तिचा नोंदणी क्रमांक, नोंदीकृत कार्यालय, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स, लेटरहेड, संपर्काचे नंबर्स, कायद्यानुसार आवश्यक ते सगळे तयार केले जाते.

पण तिच्या नावावर ना जमीन, ना इमारती, ना यंत्रसामुग्री. कंपनीचे अस्तित्व सिध्द करणारी कायदेशीर अंगे ‘‘टरफल‘‘, तर कंपनीची भौतिक साधनसामुग्री आतील ‘‘दाणा’’ म्हणता येईल.

कोणतेही उत्पादन न करता देखील शेल कंपनीच्या नावावर विक्री आणि नफ्याचे मोठे आकडे असू शकतात.

याचे कारण शेल कंपनी वस्तुमाल/सेवांचे उत्पादन करण्यासाठी स्थापन केलीच जात नाही. मग शेल कंपनी नक्की कशासाठी स्थापन केली जाते?

बहुतांश शेल-कंपन्या कॉर्पोरेटसनी स्थापन केलेल्या असतात. त्यांचा उद्देश असतो प्रचलित कॉर्पोरेट कर कायदे , आयात निर्यात कर, कंपनी कायद्यातील तरतुदी , अकाउंटन्सी मधील इ नियम... यातील फटी शोधून कर चोरी करायची. आपण उत्पादन केलेला वस्तुमाल प्रथम आपणच स्थापन केलेल्या शेल कंपनीला विकायचा, मग शेल कंपनी अजून कोणाला आणि शेवटी बाजारात. तीच गोष्ट कच्चामाल, अगदी मॅनपॉवरची कंत्राटे देखील. एका सुट्या नव्हे तर संपूर्ण कॉर्पोरेट ग्रुपचा किती कर वाचवला हा निकष लावला जातो

भारतात कमी आहेत, पण अमेरिकादी पाश्चात्य देशात अशा शेल कंपन्या टॅक्स हेवन्स मध्ये स्थापन केलेल्या असतात किंवा ज्या देशात कमीतकमी आयकर आहे अशा देशात.

जगात अनेक टॅक्स हेवन्स आहेत: ब्रिटीश वर्जिन आयलंड, बर्म्युडा, केमॅन आयलंड, डेलावेर, पूर्टोरीको इत्यादी. जगातील तीन-चतुर्थांश हेज फंड केमन आयलँड या छावणीत नोंदीकृत आहेत.

पनामा पेपर्स आठवत असतीलच. पनामा पेपर्सच्या उल्लेखानुसार मोसॅक फोनसेका या फक्त एका सल्लागार कंपनीने जगातल्या ५०० बँकासाठी १५,६०० शेल कंपन्या स्थापन केल्या होत्या. हे झाले ८ वर्षापूर्वीचे आकडे

एकाच रजिस्टर्ड पत्यावर काही शे कंपन्या असतात; म्हणून त्यांना ‘‘पोस्टबॉक्स’’ कंपन्या असे देखील म्हणतात;

कोणत्याही फिजिकल मत्ता नसताना देखील त्यांच्या विक्री आणि नफ्याचे आकडे डोळे विस्फारणारे असू शकतात.

चार्टर्ड अकाउंटंट्स/कॉर्पोरेट लॉयर्स/कर सल्लागार अशी मध्यम वर्गीय प्रोफेशनल्सची आर्मी असते; भरपूर फिया घेऊन ही मंडळी आपल्या कॉर्पोरेट क्लायंटचा शेकडो कोटी रुपयांचा आयकर किंवा अजून कोणते कर वाचवून देतात

लक्षात घेऊया की ही मंडळी जे काही करतात ते त्या त्या देशातील संबंधित कायद्यात बसवलेले असते. सगळे काही कायदेशीर असते. ते करणे बरोबर का चूक, नैतिक का अनतिक हे वेगळे मुद्दे आहेत. निवडणूक रोख्यांच्या भ्रष्टाचार समजून घेताना अशी माहिती उपयुक्त ठरेल.

---

**लोकसंसद**

## आरसीबी महिला संघाने विजेतेपद पटकावले

दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर रंगलेल्या महिला प्रीमियर लीगच्या (डब्ल्यू.पी.एल) अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने दिल्ली कॅपिटल्स संघाचा ८ गडी राखून पराभव करत विजेतेपद पटकावले. मागील हंगामात मुंबई इंडियन्सकडून पराभूत झालेल्या दिल्ली कॅपिटल्सला यंदा देखील उपविजेत्या पदावर समाधान मानावे लागले. आरसीबीला अंतिम विजेतेपदाचे पारितोषिक म्हणून ६ कोटी रुपये मिळाले तर उपविजेत्या दिल्ली कॅपिटलला ३ कोटी रुपये मिळाले. वास्तविक पुरुषांच्या आयपीएलमध्ये विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली आरसीबीचा पुरुष संघ तीनदा अंतिम फेरीत पोहोचला होता. पण प्रत्येकवेळी त्यांच्या नशिबी पराभवाची नामुष्की आली. जे इतक्या वर्षात आरसीबीच्या पुरुष संघाला जमले नाही ते आरसीबीची मराठमोळी कर्णधार स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली आरसीबीच्या महिला संघाने करून दाखवले. आरसीबीची ऑस्ट्रेलियन खेळाडू एलिस पेरीने स्पर्धेत सर्वाधिक ३४७ धावा करून विजयात मोठा वाट उचलला. या विजयाबद्दल महिला संघाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यंदाच्या स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्ससह मुंबई इंडियन्स, गुजरात जायंट्स आणि युपी वॉरियर्स या तीन संघानी भाग घेतला होता.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

---

**मराठी साहित्यिक दिनविशेष**

### एकोणीस मार्च

**१८८४:-** नामांकित गणितज्ञ, ज्योतिषशास्त्रज्ञ, सृष्टीशास्त्रज्ञ, लेखक प्रा. कैरो लक्ष्मण छत्रे यांचा जन्म. छत्रे यांनी मराठी साहित्य विश्वात स्थान मिळवले ते सृष्टीविषयक ग्रंथामुळे. फ्रेंच व इंग्रजी ज्योतिष ग्रंथाच्या आधारावर त्यांनी तयार केलेला ‘ग्रहसाधनांची कोष्टके’ व ‘पंचांग कोष्टके’ या पुस्तकांनी पूर्वापार चालत आलेल्या कालगणनेला मोठा धक्का दिला. याशिवाय हेवेवरील ग्रंथ, ज्योतिषशास्त्रावरील लेख, विद्यार्थ्यांसाठी पदार्थविज्ञानशास्त्र, अंकगणित, भूमापन आदी ग्रंथ त्यांच्या नावावर जमा आहेत. या अतिशय किचकट आणि क्लिष्ट विषय असणाऱ्या पुस्तकांची भाषा सुबोध असून मराठी पारिभाषिक शब्दांचा वापर केला आहे. **१८९२:-** ग्रंथकार जनार्दन बाळाजी मोडक यांचे निधन. प्राचीन मराठी काव्य, जुन्या बखर तसेच अप्रसिध्द संस्कृत ग्रंथ प्रकाशित करणाऱ्या काव्येतिहाससंग्रह या मासिकाचे ते एक संस्थापक होते. मोडक यांनी ‘महाराष्ट्रकवि आनंदतनय’ आणि ‘महाराष्ट्रकवि अमृतराय’ या मध्ययुगीन मराठी कवींचे काव्यग्रंथ टीपांसह संपादित केले. ‘भास्कराचार्य व तत्कृत ज्योतिष’ व ‘वेदांग ज्योतिष’ ही पुस्तके लिहिली, तसेच ‘ठाणे जिल्ह्याचे वर्णन’ देखील त्यांनी लिहिले होते. **१९१५:-** ओ. बी. सी चळवळीचे नेते, सत्यशोधक ओ. बी. सी. परिषदेचे संस्थापक हनुमंत बाबूराव उपरे यांचे निधन. राजकारणाबरोबर साहित्याच्या क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटवला होता. **१९२१:-** लेखक, आत्मचरित्रकार, पुण्याचे उपमहापौर, क्रिकेटपंच, वकील प्रभाकर बाळकृष्ण जोग यांचा जन्म. त्यांनी ‘खुल्लम खुल्ला’,‘मी हा असा आहे’,‘मी हा असा भांडतो’ अशी तीन आत्मचरित्रात्मक ग्रंथ लिहिले. **१९२८:-** लेखक, चित्रकार प्रा. दिवाकर डेंगळे यांचा जन्म. ह्यांची ‘मुक्त हस्त चित्रण’, ‘रंग व रंगसंगती’ आदी चित्रकलेविषयी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९३६:-** चित्रपट व चित्रवाणी क्षेत्रातील दिग्दर्शिका आणि मराठी बालवाङ्:मय तसेच नाटक लेखनात महचाची भर घालणाऱ्या सई परांजपे यांचा जन्म. ‘जास्वंदी’ (नाटक), ‘शेपटीचा शाप’, ‘भटक्याचे भविष्य’; ‘सळो की पळो (बालनाट्ये), ‘हरवलेल्या खेळण्याचे राज्य (बालकादंबरी)’ विशेष वाचनीय आहेत. तसे पाहिले तर वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षीच ‘मुलांचा मेवा’ हे त्यांचे पुस्तक प्रसिध्द झाले. ‘जादूचा शंख’, ‘झाली काय गंमत’, ‘पत्तेनगरी’, ‘माझा खेळ मला मांडू दे’ ही त्यांची आणखी काही गाजलेली बालनाट्ये याशिवाय ‘जादूचा शंख’ आणि ‘सिकंदर’ या दोन बालचित्रपटांचे आणि ‘चष्मेबहादूर’, ‘स्पर्श’, ‘कथा’ या गाजलेल्या चित्रपटांच्या त्या दिग्दर्शिका. एकंदरीत महाराष्ट्रातील काही मोजक्या महिला नाटककारांमध्ये आणि बालसाहित्यिकांमध्ये त्यांचे नाव अग्रणी आहे. **१९३८:-** कोशकार गणेश ओतुरकर यांचा जन्म. त्यांनी लिहिलेल्या ‘द्विभाषी व्यावहारिक शब्दकोशास ‘महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार’ या कोशातून २०००० इंग्रजी शब्दांना मराठीतून व इंग्रजीतून पर्यायी शब्द दिलेत. याशिवाय चौभाषी व्यावहारिक शब्दकोश, विद्यार्थी-पालक-शिक्षक संभाषण माला इत्यादी पुस्तके लिहिलीत. **१९४९:-** कवी, कथा-कादंबरीकार-नाटककार विठ्ठल कृष्ण नेरुरकर यांचे निधन. ‘चंद्रभुवन’, ‘नवरा मुलगा’, ‘आत्ताच्या आत्ता’, ‘हरिशचंद्र’ मिळून तीस नाटके, याशिवाय त्यांनी बरीच खंडकाव्ये लिहिली. ‘कवीची भेट’ हे त्यांचे पहिले दीर्घ काव्य त्यानंतर ‘भारत भरारी’, ‘राधा-कृष्ण रहस्य’, ‘हिंदवासियांचे आजचे प्रात:स्मरण’, ‘मेघप्रभाव’, ‘शिवरायाची द्वारका’ ही त्यांची दीर्घ-प्रदीर्घ काव्ये. ‘तो क्षण’, ‘देशाचे वैभव’ ह्या कादंबऱ्या आणि ‘प्रतिबिंबे’, ‘फोटोचं लग्न व इतर लघुकथा’ ह्या कथासंग्रहातून तळागाळाच्या समाजाच्या दु:खाचे चित्रण आढळते. **१९५७:-** कथा-कादंबरीकार आणि क्रांतिकारकांच्या इतिहासाचे आणि हस्तसामुद्रिक या विषयाचे लेखक शंकर दिनकर करंदीकर यांचे निधन. ह्यांनी ‘राजनैतिक कारस्थान खंड १ व २’ मधून काळया पाण्यावरील क्रांतिकारकांची जीवन चरित्रे रेखाटलीत तसेच ‘देशसेवेचा ओनामा’ व ‘खादीशास्त्र’ ही अनुवादीत पुस्तके, याशिवाय ‘अत्तरदाणी’ अर्थात चित्रमय जगतातील अत्यंत मनोरंजक गोष्टींचा संग्रह, ‘पतिव्रता सावित्री’ ही पौरोणिक कादंबरी, ‘नर्स सुंद्राबाई’ ही आणखी एक कादंबरी त्याच्या नावावर आढळते. ‘भाग्यरेषा’ हा हस्तसामुद्रिक विषयावरील त्यांचा ग्रंथ त्या काळी लोकप्रिय झाला होता. **१९६३:-** कथा, काव्य, ललित आदी स्वरुपाचे लेखन दिवाळी अंक, मासिके, वर्तमानपत्र यातून करणाऱ्या लेखिक समता रविराज गंधे यांचा जन्म. अस्मिता वाहिनीवरील ‘जागर पर्यावरणाचा’ या कार्यक्रमाचे शीर्षक गीत त्यांनी लिहिले. **१९७०:-** लेखक सूरज सरदार मुल्ला यांचा जन्म. ‘रफीक सूरज’ या नावाने साहित्यलेखन. ‘आभाळ’ आणि ‘बेबस’ हे कथासंग्रह, ‘रहबर’ ही कादंबरी, ‘सोंग घेऊन हा पोर’ या कवितासंग्रहास महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार. यंदाच्या इयत्ता दहावीच्या पाठ्यपुस्तकात कवितेचा समावेश, याशिवाय विविध विद्यापीठाय अभ्यासक्रमातून कविता समाविष्ट. अनेक कवितांची हिंदी, इंग्रजी, कन्नड मधून भाषांतरे साहित्य अकादमीची प्रवासी शिष्यवृत्ती प्राप्त. ‘रहबर’ कादंबरीवर पुणे विद्यापीठात एम् फील साठी प्रबंधिका सादर.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ मार्च

१) श्री. शरदचंद्र कृष्णाजी ठोसर
अलिबाग, १९-३-१९४२


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


# रस्ता रूंदीकरणाला वेग

## अरुंद रस्त्यावरील धोकादायक प्रवास टळणार

। दिघी । वार्ताहर ।

**श्रीवर्धन तालुक्यातील अनेक राज्यमार्ग व जिल्हामार्गाचे रुंदीकरण झाले. मात्र, गेली कित्येक वर्ष श्रीवर्धन-बोर्लीपंचतन सरळ मार्गावर दांडगुरी ते बोर्ली दरम्यान, अरुंद रस्ता असल्याने येथील प्रवास धोकादायक ठरत होता. मात्र, सातत्याने मागणी होताच रस्ता रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे.**



श्रीवर्धन-बोर्ली मार्ग हा १७ किमी अंतराचा घाट आणि वळणावळणाचा मार्ग आहे. यामधील बोर्ली ते दांडगुरी दरम्यानचा अंदाजे पाच किलोमीटर रस्ता अरुंद असून, याची रुंदी आठ ते दहा फुट एवढीच आहे. त्यात रस्त्याच्या साईडपट्टीला नेटवर्क केबलसाठी व इतर खोदकाम केल्याने उन्हाळी येथील प्रवास अवघड बनायचा.

पावसाळी रस्ता चिखलाने माखलेला असल्याने वाहनांचा प्रवास मोठा जिकरीचा ठरत होता.

दुचाकी, रिक्षा अशा वाहनाना प्रवास करताना समोरून येणाऱ्या अवजड वाहनाना साईड देतेवेळी रस्त्याच्या खाली किती उतरायचे यावरून ये-जा करणाऱ्या दोन्ही वाहन चालकांमध्ये वाद होण्याच्या घटना घडतच होत्या. अशावेळी अपघाताला ही सामोरे जावे लागायचे. रस्त्यांच्या या ठिकाणी साईडपट्टी खचल्याने व पडलेल्या खड्ड्यांमुळे दुचाकी वाहनचालकांचे वारंवार अपघात घडत असत. मागील दिवसात किमान सहा ते सात वाहनांची साईड पट्टीवरून घसरून जखमी होत असल्याची परिस्थिती निर्माण झाली. यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून या ठिकाणाहून वाहने चालावी लागत असे. प्रवासात आणखी कोणता अनर्थ घडू नये म्हणून रस्त्याची डागडुजी व रुंदीकरणाची मागणी प्रवाशी व वाहन चालकांकडून करण्यात येत होती. त्यामुळे आता अरुंद रस्त्यावरील धोकादायक प्रवास टळणार आहे. अखेर या रस्त्यासाठी अर्थ संकल्प बजेटमधून मंजुरी मिळाली असून, बोर्ली ते दांडगुरी दरम्यान दोन किलोमीटर अंतरात दोन कोटी ७५ लक्ष निधीचा वापर होऊन रस्त्याचे नूतनीकरण होणार आहे. तर पुढील तीन किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे रूंदीकरणासाठी तीन कोटी ५० लक्ष एवढा निधी वापरण्यात येणार आहेत.

> **मागणीनुसार या रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली आहे. लवकरच तीन ते चार किलोमीटर अंतराचे रुंदीकरण व नूतनीकरण करण्यात येईल.**
> **– तुषार लुंगे, उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग श्रीवर्धन**



# ‘शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्या’

। माणगाव । वार्ताहर ।

मध्यवर्ती प्रशासकीय भवन माणगाव येथे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळा शुक्रवारी (दि. १५) घेण्यात आली. या प्रशिक्षण वर्गासाठी प्रमुख मार्गदर्शक उपविभागीय कृषी अधिकारी, माणगाव आनंद कांबळे यांनी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत प्रत्येक क्लस्टरमध्ये २५ शेतकरी गट स्थापन करण्यात आले. प्रत्येक गटांसाठी या प्रकल्पांतर्गत उत्पादन पद्धतीवर आधारित असणारे विविध प्रकल्प, एकात्मिक शेती पद्धती, पशुसंवर्धन, मत्स्यसंवर्धन, अवजारे बँक, सेंद्रिय शेती, सूक्ष्मसिंचन इत्यादी बाबींसाठी असणारे अनुदान, प्रस्ताव कशा पद्धतीने तयार करायचे व उत्पादित शेतमालाला शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत बाजारपेठ उपलब्ध करणे, तसेच गटांना पीक उत्पादन पद्धतीवर आधारित प्रकल्प तयार करणे याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी जितेंद्र जोशी, एस. बी. ससाने, एस. आर. नलावडे, के. जी. शिंदे, प्रमोद शिंदे व तालुक्यातील सर्व कृषी सहाय्यक तसेच, १६० शेतकरी उपस्थित राहून प्रशिक्षण वर्गाचा लाभ घेतला.



# धुतूम गावातील भुयारी रस्ता धोकादायक

। उरण । वार्ताहर ।

धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील भुयारी रस्त्यावर रविवारी (दि.१७) दुपारी साडेतीनच्या सुमारास मालवाहू कंटेनर पलटी झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात मोटारसायकल चालक थोडक्यात बचावला आहे.

जेएनपीए बंदर प्रशासनाने एनएच फोर बीच्या माध्यमातून जेएनपीए बंदर ते पळस्पे फाटा या महामार्गाची उभारणी केली आहे. या महामार्गावरील चिर्ले व धुतूम गाव परिसरातील नागरिकांना, प्रवासी वाहनांना सुखकर प्रवास होण्यासाठी एनएच फोर बीने चिर्ले व धुतूम गावाजवळ भुयारी रस्त्याची उभारणी केली आहे. परंतु, हा रस्ता प्रवासी वाहतुकीसाठी असताना, या रस्त्यावरून रात्री-अपरात्री अवजड वाहने प्रवास करत आहेत. त्यामुळे अपघाताची संख्या बळावली आहे. तरी नागरिकांच्या रहदारीच्या भुयारी रस्त्यावर अवजड वाहनांना बंदी घालण्यात यावी, अन्यथा आंदोलन उभारणार असल्याचा इशारा धुतूम ग्रामपंचायतीच्या सरपंच सुचिता ठाकूर यांनी दिला आहे.

# भागोजी यांचा अमृतमहोत्सवी सोहळा

। माणगाव । वार्ताहर ।



कुणबी भवन माणगाव येथे भागोजी डवले यांचा अमृतमहोत्सवी कार्यक्रम रविवारी (दि. १७) त्यांच्या कुटुंबियांनी व महादेवराव बक्कम यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला होता. या कार्यक्रमास राजिपचे माजी सभापती अस्लम राऊत, यशोधरा गोडबोले, संगीता बक्कम, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, आनंद यादव, संदीप खरंगटे, कुडबा समिती सभापती रमेश मोरे, शैलेश भोनकर, रामभाऊ टेंबे, काका नवगने, शांताराम भोरावकर, सहादेव बक्कम, नामदेव शिंदे, सुरेश वाढवळ सुभाष गुगले, सतीश पवार, सखाराम जाधव, राजेंद्र जाधव, रवींद्र अर्बन, कृष्णा पानवकर, काशिनाथ पाखुर्डे, शैलेश यादव, हबीब इसाने, काशीराम पोवार, तुकाराम डवले, सीताराम भोनकर, सुरेश वडेकर, नथुराम मोरे आदींसह डवले कुटुंबीय, आप्तेष्ट, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिक्तपदांमुळे अनेक कामे प्रलंबित

। तळा । वार्ताहर ।

तळा भूमिअभिलेख कार्यालयात भूमिअभिलेख कार्यालयात रिक्त पदांमुळे अनेक कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. महसुलीचे महत्वाचे कार्यालय समजल्या जाणाऱ्या भूमिअभिलेख कार्यालयात गेल्या काही महिन्यांपासून अनेक पदे रिक्त आहेत. तालुकानिर्मिती नंतर जवळपास दहा वर्षानंतर हे कार्यालय स्थापन झाले तेव्हापासून रिक्तपदे भरली गेली नसल्याने त्या पदांचा भार इतर कर्मचाऱ्यांवर येतो.

अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे कामाचा निपटारा होत नसल्यामुळे नागरिकांना एका कामासाठी वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. सदर कार्यालयात मोजमापणी, फेरफार, वारसनोंद, फेरबदल, नकाशा, जुनी कागदपत्रे, व इतर अनेक कामे केली जातात. जमीन मोजणीचे पैसे भरून देखील सहा-सहा महिने कामे होत नसल्यामुळे जनतेला मनस्ताप सहन करावे लागत आहे. या कार्यालयात दिवसेंदिवस कामाची प्रकरणे वाढत असून मंजूर १३ पदांपैकी सद्यस्थितीत भुकरमापक एक, नगर भुमापक लिपिक, अधिलेखपाल, निमतांदार हे चारच पदे कार्यरत आहेत. त्यामुळे उर्वरित रिक्त पदे लवकरात लवकर भरण्यात यावी अशी मागणी तालुक्यातील नागरिकांकडून केली जात आहे.

# सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

। सोगाव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील किहीम ग्रामपंचायत हद्दीतील बामणसुरे येथील आदिवासी वाडीवर सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रतीक दामोदरे व प्रमिला प्रतीक दामोदरे यांचा मुलगा आदित प्रतीक दामोदरे १० वर्षीय विद्यार्थ्याने त्याच्या खाऊच्या व वाढदिवसाच्या पैशांची बचत करून सदर मदत आदिवासी विद्यार्थी बांधवांपर्यंत पोहचवली. विद्यार्थ्यांसाठी गणवेश, दप्तर, वह्या, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर, पाटी, पट्टी, घड्याळ आदी वस्तूंचा समावेश होता. यावेळी सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे प्रसन्न ठाकूर, किसन गायकवाड, परेश सुर्वे, ओंकार आमले आणि शार्दूल विजय काठे या उपस्थित होते. अंगणवाडी सेविका रीना चिंबूलकर यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.



# विश्वास म्हात्रे यांचे निधन

। पनवेल । वार्ताहर ।



पनवेल पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तथा सहाय्यक गट विकास अधिकारी विश्वास म्हात्रे यांचे गुरुवारी (दि.१४) निधन झाले. त्यानी विस्तार अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. त्यांच्यावर त्यांच्या कोप्रोली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यसंस्काराला विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते. पनवेल पंचायत समितीमध्ये त्यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ७९ ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक आणि कर्मचाऱ्यांनी तसेच पनवेल पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# सूर्य घर बिजली योजनेचे शिबीर

। सोगाव । वार्ताहर ।

मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्या माध्यमातून रविवारी (दि.१०) प्रधानमंत्री सूर्य घरमुफ्त बिजली योजनेच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात म्‍पगाव येथील भारतीय डाक विभागाचे कर्मचारी श्रीकांत थळकर यांनी मूनवली पंचक्रोशीतील ग्रामस्थांना प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना यासंदर्भात माहिती दिली. तसेच योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करीत ग्रामस्थांना मोफत नोंदणी करून घेतली. या शिबिरात ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत नोंदणी करून घेतली. शिबीर यशस्वी होण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मेहनत घेतली.



# अनिल म्हात्रे यांचे निधन

। उरण । वार्ताहर ।



चिर्ले ग्रामपंचायत हद्दीतील राजिप प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अनिल भास्कर म्हात्रे यांचे रविवारी (दि.१७) निधन झाले आहे. निधना समयी त्यांचे वय ५४ वर्षे होते. त्यांनी पोलादपूर तालुक्यातील अतिदुर्गम भागातील शाळेत विद्यार्थ्यांना अभ्यासाचे धडे दिले. त्यानंतर त्यांनी उरण तालुक्यातील खोपटा, चिरनेर पाणजे, मुळेखंड शाळेवर शिक्षक म्हणून काम पाहिले. यांना २०१४-१५ साली रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यावर खोपटा गावातील स्मशानभूमीत त्यांच्या देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले, यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# वाहनाच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

। पनवेल । वार्ताहर ।

भरधाव आलेल्या वाहनाने दिलेल्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक पळून गेला. त्याच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोयंजे बीट हद्दीत पोलीस पेट्रोलिंग करत असताना जुन्या पुणे - मुंबई महामार्गावर पनवेल बाजूकडे येणाऱ्या लेनवर भिंगारवाडी बस स्टॉपजवळ वाहनाच्या धडकेत एकाचा अपघातात मृत्यू झाल्याचे पोलिसांना दिसून आले. मृत व्यक्ती ६० ते ६५ वर्षीय असून, त्याच्या हातावर ओमसारखे दिसणारे गोंदलेले आहे. याप्रकरणी पोलीस तपास करत आहेत.

# गोखले महाविद्यालयात पदवीप्रदान समारंभ

। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि. १६) मुंबई विद्यापीठ पदवीप्रदान समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी सन २०२२-२३ या वर्षांत बी.ए, बी.कॉम, बीएससी., एमकॉम. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रा. डॉ. निलेश चव्हाण यांनी केले. तर, अतिथींचा परिचय, प्रा. पंकज गमे यांनी करुन दिला. या पदवीदान समारंभ प्रसंगी मुख्य अतिथी, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सीडीसी सदस्य यांनी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना पदवी नंतरच्या भावी जीवनासाठी मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. तसेच पदवी प्राप्त अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनींनी महाविद्यालय व आपल्या गुरुजनांप्रती भावपूर्ण असे मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून स्व. गोपीनाथ मुंडे महाविदयालय मंडणगड, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रा. डॉ. जाधव तसेच स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य, नितीन सुर्वे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा. किशोर लहारे, डॉ वाल्मिक जोंधळे महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.श्रीनिवास जोशी व सर्व प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, अर्थशास्त्र विभागाच्या प्रा.दिपाली पाठराबे व प्रा. नवज्योत जावळेकर यांनी केले.



या कार्यक्रमास माजी विद्यार्थी व काही पालकही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे गोखले संस्थेचे वरीष्ठ पदाधिकारी आणि स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# कर्तृत्वाच्या सावलीचा संकल्पकडून सन्मान

। पनवेल । वार्ताहर ।

२१ व्या शतकामध्ये ही पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक संस्कृती प्रचलित आहे. परंतु, जिजाऊ आणि सावित्रीच्या लेकींनी स्वतःचे कर्तुत्व सिद्ध करून सर्व क्षेत्र पादाक्रांत केले आहेत. ते करत असताना यशस्वी पुरुषाला एक स्त्रीच यशाचे शिखर गाठण्यासाठी पाठबळ देते. त्याच्या सुखदुःखात आणि अडचणीच्या काळामध्ये खंबीरपणे साथ देते. अशा कर्तुत्वाच्या मसावलीचाफ सन्मान करून वैशाली जगदाळे यांनी आपल्या संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून अनोखा महिलादिन साजरा केला.



यावेळी विनोद साबळे, नवनाथ साबळे, बाळू फडके, अमर वामन, नीता माळी, सुदेशना गुप्ता, मानसी पोळ, शर्वरी सावंत, सपना सावंत, स्वप्निल काटकर, अतिश साबळे, प्रिया फडके, सुषमा मयेकर उपस्थित होते.

# इमारतीचा भाग कोसळण्याची भीती

। उरण । वार्ताहर ।

उरण शहरातील अनेक इमारतींचे बांधकाम जीर्ण झाले आहे. त्यामुळे मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये कोणीही रहिवासी वास्तव्य करु नये यासाठी प्रत्येक इमारतींना उरण नगरपरिषदेने नोटीसा बजावल्या आहेत. त्यामुळे या इमारतींमध्ये कोणीही राहात नाही.

मात्र, सदर इमारतीचा काही भाग रहदारीच्या रस्त्यावर कोसळला तर नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती प्रवासी, नागरिक व्यक्त करीत आहेत.

उरण शहरात सुमारे ७२ इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. अशा इमारतींना नगरपरिषदेने नोटिसा बजावल्या आहेत.

मात्र, मोडकळीस आलेल्या इमारतींचा काही भाग हा रहिवाशांच्या रहदारीच्या रस्त्यावर कोसळण्याच्या स्थितीत आहे. एकंदरीत, गजबजलेल्या रस्त्यावर सदर इमारतींचा भाग कोसळला, तर प्रवासी नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. तरी, नगरपरिषदेने जीवितहानी टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते नरेश भोईर यांनी केली आहे.

# घरगुती मसाला बनविण्याची लगबग

## चौक येथील मसाला केंद्रांवर गर्दी

। रसायनी । वार्ताहर ।

**उन्हाची झळ लागायला सुरुवात झाली की, महिलांकडून वाळवणे, मसाले बनवण्याची तयारी सुरू होते. दररोजच्या जेवणासाठी लागणारा लाल मसाला हा प्रत्येकाच्या घरात लागतोच. प्रत्येकाच्या मसाला बनवण्याच्या वेगळ्या पद्धती आहेत. सुका मसाला, लाल मसाला, घाटी मसाला, गोडा मसाला, आगरी-कोळी मसाला असे या मसाल्याचे प्रकार आहेत. प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने मसाला बनवून घेतात.**

मात्र, ऐन हंगामामध्ये मिरचीचे भाव वाढत असल्यामुळे महिला वर्ग आधीपासूनच मिरची खरेदी करून तिला तीन ते चार वेळा उन्हात वाळवून मग आवश्यकतेनुसार त्यामध्ये गरम मसाला, धणे, बडीशोप आदी पदार्थ एकत्र करून मसाला तयार करून घेतात.



मसाल्यांच्या खरेदीला वेग आला असून, तिखट बनवण्यासाठी लागणाऱ्या मसाल्यांची आवक बाजारपेठेत झाली आहे. मिरची, मिरची पूड, खडा मसाला या महत्त्वाच्या पदार्थांना मागणी वाढली आहे. साधारणपणे मार्चमध्ये घराघरात तिखट बनवण्याची घाई सुरू होते.

मिरची खरेदीपासून तिखटासाठी लागणाऱ्या पदार्थांच्या खरेदीची सुरुवात केली जाते. सध्या ही कामे अंतिम टप्प्यात आहेत.

गावाला बनविलेल्या मसाल्याने स्वयंपाकाला विशिष्ट चव येते हे माहीत असल्याने हल्ली मुंबईला राहणारे चाकरमानीदेखील गावाला असलेल्या आपल्या नातेवाईकांकडून मसाला बनवून घेतात. त्यामुळे एक महिना आधीपासूनच गृहिणींची मिरची खरेदीसाठीची लगबग सुरू झाली आहे.

निवडक

## महिला मेळावा उत्साहात

**खांब :** कोलाड येथे स्नेह महिला मेळावा उत्साहात संपन्न झाला. अनुराधा म्हात्रे, राऊत, गांधी, कुर्ले, अविनाश म्हात्रे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मेळाव्यास प्रारंभ करण्यात आला. मारूती राऊत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी आरोग्याची काळजी कशी घ्यावी आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या मेळाव्यात पन्नासहून अधिक महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. कार्याध्यक्ष प्रवीण गांधी यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## दरवाजे फोडून नुकसान

**पनवेल :** शाळेच्या खेळण्याच्या मैदानात असलेल्या बाथरूमचा दरवाजा आणि बोअरिंगच्या पाइपचे तोडून फोडून नुकसान केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. बालाजी न्यू इंग्लिश स्कूल, कुडावे गाव या शाळेच्या मैदानातील साहित्याचे अज्ञात इसमाने नुकसान केले. याची माहिती मिळताच येथील क्लार्कने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अल्पवयीन मुलावर गुन्हा

**पनवेल :** तळोजा परिसरात राहणारी मुलगी सोशल मीडियावर रील बनविण्याचे काम करते. एका मुलाकडून सोशल मीडियावर मेसेज करून मॉर्फ केलेले फोटो पाठवले. हे फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन लैंगिक शोषणासाठी ब्लॅकमेल केले जात होते. तिचे मॉर्फ केलेले फोटो तिलाच पाठवून ते व्हायरल करण्याची धमकी दिली जात होती. ते टाळण्यासाठी तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली होती. याप्रकरणी अल्पवयीन मुलावर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दुर्गामाता मंदिराचा वर्धापनदिन

**पनवेल :** पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटी येथे असलेल्या श्री दुर्गामाता मंदिर पनवेलतर्फे यंदाच्या चाळीसाव्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन सोमवारी (दि. १८) करण्यात आले होते. या निमित्ताने पहाटे काकड आरती, चंडिकाहवन, महाअभिषेक, महापूजा, पालखी उत्सव व तीर्थ प्रसाद वितरणाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अग्रवाल कुटुंबियांनी दिली. या वर्धापन दिन सोहळ्याचा पनवेलकरांसह भक्तांनी सहभाग घेतला होता.

## दिव्यांगांना कर्जासाठी लिंक

**रायगड :** महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज योजनांचा लाभ जास्तीत-जास्त दिव्यांग व्यक्तींना मिळण्याकरीता महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या www.mshfdc.co.in संकेतस्थळावरील डाऊनलोडमध्ये कर्ज योजनांचे अर्ज व महामंडळाचे माहितीपत्रक https://mshfdc.co.in/index.php/ २०१३-०४-१२-१३-२०-५६ या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक एस.आर.म्हसकर यांनी दिली आहे.

# आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करा

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे प्रतिपादन

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या परिसरात निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिले.**



आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. रायगड मतदारसंघासाठी तिसऱ्या टप्प्यात म्हणजे ७ मे रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यात शनिवारपासून लोकसभा निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासकीय, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले भित्तीपत्रक, झेंडे, कटआऊट्स, संदेश काढून त्याचा अहवाल २४ तासात सादर करावा. भिंतीवरील रंगविलेल्या जाहिरातीदेखील काढण्यात याव्यात, असे निर्देश जावळे यांनी दिले.

'सी-व्हिजील' ॲपवर आलेल्या तक्रारींसंदर्भात तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

मतदान केंद्रांवरील सुविधा विशेषत: पाणी, वीज, स्वच्छतागृहे, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प याचेही आतापासून नियोजन करा. सर्व संबंधित यंत्रणांनी मतदान केंद्रांना भेटी देऊन पाहणी करावी. तसेच आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा तयार करून घ्याव्यात. तसेच भरारी पथक सक्रीय ठेवा.

आचारसंहिता काळात नवीन विकासकामांना परवानगी देता येणार नाही. तसेच नवीन कामांना सुरुवात करता येणार नाही.

सद्यःस्थितीत सुरु असलेली कामे नियमितपणे सुरु ठेवायची आहेत, असेही जावळे यांनी स्पष्ट केले. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रत्येकांनी 'स्वीप'चे आतापासूनच नियोजन करावे. त्यादृष्टीने काही वेगळे अनोखे उपक्रम राबवावेत. सर्व समाज घटकांचा यामध्ये सहभाग घ्यावा. त्यांच्यामध्ये जनजागृती करावी, असेही निर्देश जावळे यांनी यावेळी दिले.

निश्चित केलेली सभा ठिकाणी सर्व राजकीय पक्षांना सभा घेण्याची समान संधी देण्याबाबत संबंधित यंत्रणेमार्फत कार्यवाही करण्यात यावी. शासकीय विश्रामगृह यांचा वापर राजकीय कारणासाठी अथवा प्रचार, सभा, मेळावे यासाठी होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी असलेल्या नियमांचे सर्वांनी पालन करावे. कुणीही राजकीय प्रचारात सहभागी होऊ नये, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. निवडणूक ही सामूहिक जबाबदारी आहे. सर्वांनी आपल्या कर्तव्याचे आणि जबाबदारीचे पालन करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी तसेच सर्व नोडल अधिकारी आणि विभाग प्रमुख उपस्थित होते.

## विसपुते महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद

**। पनवेल । वार्ताहर ।**

श्री ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी आणि रिसर्च सेंटर, नवीन पनवेल तसेच ऑपरंट फार्मसी फेडरेशन आणि अखिल भारतीय औषधनिर्माणशास्त्र शिक्षक परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने फार्म ३६० इमर्जिंग ट्रेंड्स आणि फ्युचर पर्स्पेक्टिव्स इन फार्मास्युटिकल्स या विषयाला अनुसरून अत्यंत महत्त्वाच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय सम्मेलनाचे आयोजन २२,२३ मार्च रोजी श्री दादासाहेब धनराजजी विसपुते सभागृह, नवीन पनवेल, नवी मुंबई येथे होणार आहे.

संमेलनामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवी आणि मानांकित वक्ते व संशोधकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. विश्वभरातील सम्माननीय वक्तांची श्रेणी येथे समाहित केली जाईल. या संमेलनामध्ये विविध राज्यातून ४५० हून अधिक विद्यार्थी व संशोधकांनी नोंदणी केल्याची माहिती डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. आशिष जैन यांनी दिली आहे.

२५० हून अधिक विद्यार्थी व संशोधक त्यांचे प्रबंध ई-पोस्टरच्या माध्यमांतून सादर करणार आहेत. हे संमेलन शैक्षणिक आणि औद्योगिक संशोधकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी एक वेगळा अनुभव देणारे मौल्यवान व्यासपीठ ठरेल.

## वातावरण बदलामुळे आरोग्य समस्या

**। तळा । वार्ताहर ।**

सध्या वातावरणात उष्णतेच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून वाढत्या उष्णतेचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम जाणवू लागला आहे. काही दिवसांपूर्वी पडलेल्या कडकडीत थंडीनंतर अचानक हवेतील उष्णतेच्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे नागरिकांच्या अंगाची लाही लाही होत असून उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांना उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वारंवार उन्हातून फिरल्यामुळे शरीरातून घाम येऊन त्वचेचे विकार होण्याची देखील शक्यता आहे. दिवसा कडक उन्हाच्या झळा तर रात्री गारटा पडत असल्याने नागरिकांना आरोग्याच्या समस्या जाणवू लागल्या आहेत.



### काय काळजी घ्यावी?

**वाढत्या उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांपासून वाचण्यासाठी नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. दुपारी बारा ते चार शक्यतो घरातून बाहेर पडणे टाळावे, महत्वाच्या कारणासाठी बाहेर पडावे, स्त्रियांनी चेहऱ्याला स्कार्फ अथवा ओढणी बांधावी तर पुरुषांनी रुमालाचा वापर करावा. यांसह टोपी किंवा छत्री घेऊन बाहेर पडावे. मोटारसायकलवरून प्रवास करताना गॉगलचा वापर करावा, शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये, यासाठी भरपूर प्रमाणात पाणी प्यावे, ऊसाचा रस, लिंबू सरबत, कोकम सरबत यांचे सेवन करावे तसेच कलिंगड, मोसंबी, संत्री, केळी यांसारखी फळे खावी असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात आले आहे.**



## प्रशासनाचे मतदार राजांना मतदानासाठी आवाहन

**। पाली । वार्ताहर ।**

लोकसभेसाठी निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या असून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.यापार्श्वभूमीवर सुधागडातील भेरव याठिकाणी मतदारांनी लोकसभेसाठी जास्तीत जास्त टक्के मतदानाचा अधिकार बजावावा यासाठी सुधागड तालुका तहसीलदार तथा सहा.निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून आवाहन करण्यात आले आहे.

मागील लोकसभा निवडणुकीला भेरव येथील मतदार केंद्रावर केवळ १६ टक्के इतकेच मतदान झाले होते त्यामुळे यावेळी हा टक्का वाढावा यासाठी तहसीलदारांकडून मतदारांना आवाहन करण्यात आले. आपले मत हे अमूल्य आहे.

संविधानाने आपल्याला आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिलेला आहे.

आपल्या मताची शासन स्तरावर नोंद झाली पाहिजे. आपले मत वाया जाऊ नये तसेच ठाणे, मुंबई, पुणे सारख्या बाहेरगावी राहणाऱ्या मतदारांना देखील मतदानासाठी येण्याचे व बहुसंखेने उपस्थित राहून मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे यांनी केले आहे.

यावेळी मंडळ अधिकारी अंकुश साळवे, तलाठी उद्धव गुंजाळ, पोलीस पाटील अमिषा सागळे, सामाजिक कार्यकर्ते अतिश सागळे, सतीश मांढरे, मंगेश मांढरे, सोनाली मांढरे, दीपक पुशीलकर, रामचंद्र मोरे, प्रभाकर टक्के शाळेतील शिक्षिका रश्मी लखीमळे, तसेच महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'दी लाईफ फाऊंडेशन'तर्फे नेत्रतपासणी



**। सोगाव । वार्ताहर ।**

आरोग्य, शैक्षणिक तसेच इतर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारी अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील दी लाईफ फाऊंडेशन, ग्रुप ग्रामपंचायत झिराड तसेच शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे शुक्रवारी (दि.१५) राजिप शाळा झिराड येथे आयोजन करण्यात आले होते.

या नेत्रतपासणी शिबिरात एकूण १३१ नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली. यामध्ये १९ रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले. यातील पिवळ्या व केशरी रेशन कार्ड धारक असलेल्या ८ रुग्णांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी शंकरा आय हॉस्पिटल पनवेल येथे नेण्यात आले. तर उर्वरित ११ रुग्णांना वैद्यकीय अडचणीमुळे जाता आले नाही. या शिबिरात नेत्रदोष असणाऱ्या रुग्णांना अल्पदरात चष्मे वाटप करण्यात आले. या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर यशस्वी करण्यासाठी दी लाईफ फाऊंडेशनचे कार्यकर्ते यांनी मेहनत घेतली.



**महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना रायगड जिल्हा सर्व श्रेष्ठ सेवा सन्मानार्थ पीएनपी माध्यमिक शाळा केलटे या शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा कासार यांना गौरविण्यात आले. यावेळी भारतीय शिक्षण संस्थेचे प्रमुख किशोर जैन, ॲड. आस्वाद पाटील, सुरेंद्र म्हात्रे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.**

(छायाचित्र : अमोल नाईक)

## गावठी कडधान्यांना मागणी

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनीतील वासांबे मोहोपाडा बाजारपेठेत स्थानिक शेतकऱ्यांचे कडधान्य विक्रीसाठी येऊ लागले आहे. नागरिकांकडून कडधान्यांना चांगली मागणी आहे. तसेच चांगला भाव मिळत असल्याने विक्रेते समाधान व्यक्त करत आहेत.

सध्या पौष्टीक आहाराकडे अनेकजण वळले आहेत. त्यामुळे प्रोटीनयुक्त कडधान्यांना मागणी वाढत आहे. रसायनी परिसरातील चावणे, आपटे, वडगाव, मोहोपाडा पंचक्रोशीतील शेतकरी खरिपाच्या भातपिकानंतर दुबार जास्त करून वालासह चवळी, हरभरा, मटकी, मूग आदी प्रकारच्या कडधान्यांचे पीक घेऊ लागले आहेत.

यंदाच्या वर्षी कडधान्यांच्या पेरणीनंतर मध्यंतरी खराब हवामान असल्याने परिणामी किडीचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळे कडधान्यांच्या उत्पादनाला फटका बसला असल्याने पिकाचे उत्पादन कमी झाले आहे. तर झाडांना शेंगा चांगल्याप्रकारे आल्याने शेतकरी कडधान्यांसह शेंगा बाजारात विक्रीसाठी घेऊन येत आहे. शिवाय त्याला चांगला भावदेखील मिळत आहे. दरम्यान, वासांबे मोहोपाडा येथील बाजारपेठेत मागील चार ते पाच दिवसांपासून वाल, मूग, चवळी, गावठी हरभरा आदी कडधान्य विक्रीसाठी येऊ लागले आहेत. यामध्ये वाल १८०, चणा, मूग, मटकी आणि चवळी १७० रुपये किलो भावाने विकले जात असल्याचे पोयंजे येथील विक्रेत्या कलावती ठाकूर यांनी सांगितले. सध्या आवक कमी असल्याने भाव जास्त आहे. येथील स्थानिकांच्या गावठी कडधान्यांना आवर्जून पसंती देतो, असे ग्राहक शीतल म्हात्रे यांनी सांगितले.

## पत्रकार संघाचे अधिवेशन उत्साहात

**। रसायनी । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईच्या वतीने चिंचवड येथे आयोजित राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव, खा. डॉ. अमोल कोल्हे, आ. महेश लांडगे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंढे, मोरेश्वर भोंडवे, चेतन भुजबळ, उदय निरगुडकर, महेश म्हात्रे, आशिष जाधव, मंदार फणसे, अरविंद जगताप, निरंजन टकले, सम्राट फडणवीस आदी उपस्थित होते.

मराठी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात शैलेश पालकर यांना निर्भिड पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात आले. तर रसायनी येथील पत्रकार राकेश खराडे यांचा सन्मान करुन त्यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.




## तळ्यात शिमगोत्सवास सुरुवात



**। तळा । वार्ताहर ।**

कोकणी माणसाच्या जिव्हाळ्याचा सण समजला जाणाऱ्या शिमगोत्सवास गुरुवारपासून तळ्यात सुरुवात झाली. शिमगोत्सवासाठी मोठ्या प्रमाणावर मुंबईकर चाकरमानी कोकणात आपल्या गावी परततात. रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, म्हसळा, महाड, तळा, माणगाव या तालुक्यात शिमगा म्हणजे जणूकाही दिवाळी दसऱ्या सारखा भासतो. शिमग्याचे पुढील दहा दिवस होळ्या, ग्रामदेवतेच्या पालखीची लगबग, दर्शनासाठी झुंबड, शंखासुराचा मार, गोमुचा नाच, शिमग्याची सोंग जणूकाही आनंदाची पर्वणीच. त्या अनुषंगाने तळा तालुक्यात सर्वत्र होळीच्या मैदानावर प्रथम होळी (पहिला पिला) लावण्यात आला. सकाळपासूनच होळीसाठी बच्चे कंपनीची लगबग सुरू झाली होती.

जंगलात जाऊन झाडाच्या फांद्या आणणे, होळी रचणे, गावातून हाळकुंड मागून आणणे आशा अनेक कामांतून लहानमुलांचा उत्साह दिसून येत होता. शिमगोत्सवात मोबाईलमध्ये गुंतलेली मुले होळीसाठी एकत्र येत असल्याचे चित्र पाहायला मिळते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८ ते ६
संपर्क - ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९

Roohi Enterprises
Required sales man for market order
for Hindustan uniliver Ltd. Agency
Add : Wadgaon opp. Pataka Devi Mandir
8888699944/8411987899

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रेस्टॉरंट मनेजर २.वेटर ३.साऊथ इंडियन नाश्ता बनवणारा कूक ४.अकाउंटंट २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५.
- अलिबाग परिसरामध्ये N.A. प्लॉट विकणे आहे. २५.L गुंठा Sun Stone Real EStat Co No. 8669006902
- इन्वर्टर बॅटरी सर्विस ७०६६१३८३६८
- जमीन विकणे आहे. ता. अलिबाग- ३२ गुंठे, ता. रोहा, ५०/१४३/२१/१६२ ७०६६१३८३६८
- शिवानी पेट शॉप, अलिबाग येथे कामाकरीता मुलगी पाहिजे (कमीतकमी १२ वी पास) संपर्क : ९२७२३८३४७६/९८६०६५८४९६
- अलिबागपासून सुमारे दहा किलोमीटरवर वढाव (खुर्द) येथे गावठाणनजीक ३० गुंठे शेतजमीन बोअरवेल, मीटर व घरपरवानगीसहीत विकणे आहे. संपर्क : ७२७६५९१३०२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# भुयारी मार्गातील वाहनांवर जलाभिषेक

## पाण्याच्या साठ्याबाबत सर्वच अनभिज्ञ



**। पोलादपूर । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गातून जाणाऱ्या वाहनांवर भुगर्भातील जलाशयाचा गेल्या तीन वर्षांपासून होणाऱ्या जलाभिषेकाचा मारा अद्याप सुरू असून भुयाराच्या वरील भागातून संततधार पाण्याचा अभिषेक होत असताना कातळामध्ये कोठे व किती पाण्याचा साठा असू शकेल, याबाबत सर्वच अनभिज्ञ दिसून येत आहेत.

मुंबईकडून कोकणात जाण्यासाठी गणेशोत्सवकाळामध्ये या कोकणातून मुंबईकडे जाणाऱ्या भुयारी मार्गाचा वापर झाल्यानंतर काही काळ भुयारी मार्ग वाहतुकीसाठी पुन्हा बंद करण्यात आला होता. मात्र, त्यावेळी भुयारामध्ये पहिल्यांदाच दोन मोटारसायकली घसरून झालेल्या अपघाताचे कारण हे कातळातून होणाऱ्या भुगर्भातील पाण्याचा जलाभिषेक असल्याचे स्पष्ट झाले होते. आंगणेवाडी यात्रेसाठी पुन्हा गेल्या आठवड्यामध्ये हा भुयारी मार्ग कशेडी घाटाला पर्यायी रस्ता म्हणून सुरू करण्यात आला असता अनेक वाहनांवर भुयाराच्या वरील भागातून होणारा जलाभिषेक सुरू राहिल्याचे दिसून आले. त्यानंतर अद्याप हा भुयारी मार्ग कशेडी घाटाला पर्यायी व्यवस्था म्हणून वाहतुकीस खुला करण्यात आला असताना कातळातून संततधारेप्रमाणे रस्त्यावर कोसळणारे पाणी रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनांवरदेखील कोसळत जलाभिषेक करीत असल्याचे दिसून येत आहे.

कोकणात शिमगोत्सवानिमित्त जाणाऱ्या चाकरमान्यांसाठीही कशेडी घाटाला पर्यायी भुयारीमार्ग खुला राहणार असल्याने या जलाभिषेकाची तीव्रता वाहनांमुळे भुयाराला बसणाऱ्या हादऱ्यांनी वाढल्यास कोणती आणिबाणीची परिस्थिती अचानक उदभवू शकते, याबाबत राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग आणि एनएचएआय म्हणजेच नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांच्यामार्फत सतर्कतापूर्वक जनजागृती करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

# कळंबोलीत राष्ट्रीय कायदा महोत्सव साजरा


**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोलीतील केएलई सोसायटीच्या केएलई कॉलेज ऑफ लॉ द्वारे आयोजित स्पार्कल ५.० ने नॅशनल मूट कोर्ट स्पर्धा आणि राष्ट्रीय ग्राहक समुपदेशन स्पर्धेद्वारे कायद्याच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कलागुणांचे प्रदर्शन केले. स्पर्धेचा दुसरा टप्पा, उपांत्यपूर्व, उपांत्य आणि अंतिम फेरीचा समावेश असून, सहभागी संघांकडून कठोर कायदेशीर युक्तिवाद आणि धोरणात्मक वकिली करण्यात आली.

अंतिम फेरीसाठी न्यायाधीशांच्या प्रतिष्ठित पॅनेलमध्ये न्यायमूर्ती एन.आर. बोरकर, मुंबई उच्च न्यायालयाकडून प्रा.डॉ. व्यंकटराव, आयआययूएलआर गोवाचे कुलगुरू आणि न्यायमूर्ती ए.के.मेनन, मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश, यांनी सखोल मूल्यमापन प्रक्रिया सुनिश्चित केली. दोन्ही इव्हेंटच्या अंतिम स्पर्धकांनी कायदेशीर तत्त्वे आणि प्रेरक वकिलाती कौशल्यांची सखोल समज दाखवून अंतिम फेरी बौद्धिक पराक्रमाचे प्रदर्शन केले. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्ना बी वर्ले यांच्या हस्ते संपन्न झालेल्या समापन समारंभाने या कार्यक्रमाला खूप प्रतिष्ठा मिळवून दिली. सर्व सहभागींनी दाखवलेल्या कठोर परिश्रम, समर्पण आणि प्रतिभेचा हा उत्सवाचा आणि पावतीचा क्षण होता. राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेचे विजेते एनएमआयएमएस हैदराबादचे होते, उपविजेते ख्रिस्त लवासाचे होते. क्लायंट समुपदेशन स्पर्धेत, जीएलसी मुंबई विजेते झाले, त्यानंतर युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ लीगल स्टडीज, पंजाब युनिव्हर्सिटी, चंदीगड हे उपविजेते ठरले. हे विजय केवळ त्यांच्या संबंधित स्पर्धांमधील विजयाचे प्रतीकच नाहीत तर उत्कृष्टता, संशोधन आणि वकिली कौशल्यांसाठी सहभागींची वचनबद्धता देखील प्रतिबिंबित करतात. या कार्यक्रमाची सांगता टाळ्या, मान्यता आणि कायद्याच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या कायदेशीर विचारांना प्रेरणा देऊन झाली.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-शिलार, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १.विद्या विवेक देशमुख<br>२.उज्वला उदय पाटणकर<br>३. वंदना सेंथिल नाथन<br>४. श्रीनिवास मधुकर पुरंदरे | ३७ | ३ | ३-७०-०० पो.ख.<br>०-३७-०० एकुण<br>४-०७-०० | २-९९ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरुपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १९-०३-२०२४

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि.रायगड
मो. ९५९५२११८६७

---

पु.ता. २६-०३-२०२४
ॲड. अनिरुद्ध गो. तुळसणकर, पनवेल
अर्जदाराचे वकील

प्रोसेस जमा ता.

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात...**

दि.चौ.अर्ज क्र.१४०/२०२२
नि. ८/ड

सावित्री रवी सुवर्णा,
वय- ५३ वर्षे धंदा-गृहिणी,
रा. फ्लॅट नं. १०४, कॉटेज व्हिला, — अर्जदार
प्लॉट नं. ८९, सेक्टर १०, तळोजा फेज -१,
तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०८

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की,

१) अर्जदार यांचा भाऊ कै. जयकुमार पदमनाभन नायर यांचे दि.१९-०९-२०२१ रोजी देहावसान झाले आहे. कै. जयकुमार पदमनाभन नायर यांची आई थानकम्मा पदमनाभन नायर यांचे देखील सुमारे चार वर्षापुर्वी देहावसान झाले आहे. कै. जयकुमार पदमनाभन नायर हे अविवाहित, विनाअपत्य मृत्यू पावले आहेत. कै. जयकुमार पदमनाभन नायर यांना हिंदू वारस कायद्याप्रमाणे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. कै. जयकुमार पदमनाभन नायर हे रिलायंन्स इंडस्टीज लिमिटेड, नागोठणे, ता. रोहा या कंपनीमध्ये नोकरीस होते. सदरहु नोकरी करीत असताना कै. जयकुमार पदमनाभन नायर यांस कंपनीकडून मिळणारे फायदे आणि लाभ यामध्ये अर्जदार यांचे नाव नॉमिनी म्हणून नमूद केलेले आहे. कै. जयकुमार पदमनाभन नायर यांस मृत्यूपश्चात कंपनीकडून मिळणारे फायदे व लाभ याचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No. | Head/purpose |
|---|---|
| 1 | Death Benevolent Fund Benefit |
| 2 | Gratuity Benefit |
| 3 | Group Saving Linked Insurance Benefit |
| 4 | PF Benefit |
| 5 | Pension Benefit |
| 6 | Superannuation Benefit |
| 7 | GPAI & GTLI |
| 8 | Group Term Assurance Scheme |

वर सावित्री रवी सुवर्णा हे कै. जयकुमार पदमनाभन नायर यांचे कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट सावित्री रवी सुवर्णा, यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. जयकुमार पदमनाभन नायर यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ०७-०३-२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-** **लिपीक** **दिवाणी न्यायालय व.स्तर अलिबाग**

**सही/-** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व.स्तर अलिबाग**

---

दिनांक : १९ मार्च २०२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे आमचे अशिलांनी विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे किकवी, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी | आकार रू.-पै. |
|---|---|---|---|---|
| सिल्वी पिंटो | १४६ | ४७ | ५२८.०० | ५२-८० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

सही/-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे,**
दिनांक :१९/०३/२०२४
मो.नं.९१५८२७७७२८

---

दि. १८-०३-२०२४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक रुपेश धर्माजी पाटील वगैरे यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता.अलिबाग | १३६/१/२ | ०-४२-३०<br>पो.ख. ०-०४-१०<br>एकूण क्षेत्र ०-४६-४० | ६.८१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी रुपेश धर्माजी पाटील यांच्या सामाईक हिश्यातील ०-१५-५० हे. आर. इतक्या क्षेत्राची मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारस हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर), पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९८२३२३११२२

---

दिनांक : १९ मार्च २०२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून श्री.गुनीता कौर बिंद्रा रा.५०१, बसंत, प्लॉट नं.डी/९००, ए/२, ६३९ फ्लोर, १९ रोड, खार वेस्ट, मुंबई ४०००५२. यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे टेंभरे, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर-पॉ. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| रमेश गणपत निलधे (पाटील) वै | ६० | ४ | ४-५९-० | १ | ३८ |
| | यापैकी लिहुन देणार यांचे मालकीचे क्षेत्र ४-०-०२ | | | | |
| | यापैकी विक्री केलेले क्षेत्र हे-२, आर-४९, पॉ-० मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

सही/-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे,**
दिनांक :१९/०३/२०२४
मो.नं.९१५८२७७७२८

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे उसर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अजय गणपत नाटेकर रा. पिंपळभाट चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| उसर ता.अलिबाग | ५६/५ | | ०-०१-०० | ०.०२ |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- १८-०३-२०२४

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
पत्ता :-रा. गाळा नं. ४, दुय्यम निबंधक
कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि. रायगड

---

# 'भारत जोडो' यात्रेसाठी रायगड काँग्रेसची उपस्थिती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवाजी पार्क दादर-मुंबई येथे भारत जोडो न्याय यात्रेच्या सांगता सभेला रायगड जिल्हा काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव ॲड प्रविण ठाकूर, काँग्रेस महिला पदाधिकारी कविता ठाकूर, रायगड जिल्हा काँग्रेस वरिष्ठ उपाध्यक्ष राजा ठाकूर, रायगड जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष सुनिल थळे, अलिबाग तालुका काँग्रेस भास्कर चव्हाण, जिल्हा चिटणीस प्रभाकर राणे, काँग्रेस प्रवक्ते एस.एम. पाटील काँग्रेस पदाधिकारी जगदिश कवळे, काँग्रेसचे अल्पसंख्यांक पदाधिकारी चौधरी मोदी उपस्थित होते.

अलिबाग तालुका काँग्रेस सहसचिव महेंद्र म्हात्रे, प्रा.राकेश पाटील, बेलोशी माजी सरपंच कृष्णा भोपी, काँग्रेसचे तालुक्यातील सरपंच, उपसरपंच व विविध क्षेत्रातील मंडळी, युवक काँग्रेस अध्यक्ष आकाश राणे, काँग्रेस पदाधिकारी उल्हास वाटकरे, काँग्रेस पदाधिकारी काका ठाकूर, भास्कर भोपी, स्वप्नील ठाकूर युवक काँग्रेस पदाधिकारी समिर ठाकूर यांनी चांगले व्यवस्थापन केले. यावेळी राजा ठाकूर व भास्कर चव्हाण यांनी सर्व पदाधिकारांचे अभिनंदन केले.तसेच काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे हात बळकट करण्यासाठी हम तुम्हारे साथ है अशा घोषणा देण्यात आल्या.

---

### पेण प्राथमिक शिक्षक सहाकारी पतपेढी लि.पेण रायगड

**सिलबंद कोटेशन मागवीत आहे**

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण रायगड या संस्थेच्या शतक महोत्सवा निमित्त सन्मानचिन्ह ४५० नग व ट्रॉफी ४० नग खरेदी करण्यासाठी तसेच संस्थेचे संस्थापक कै.ना.भि. दाबके गुरुजी यांचे ३ बाय ४ चे तैलचित्र बनविणे कोटेशन मागवीत आहोत वस्तूंचे स्वरुप पेण कार्यालयत पाहावयास मिळतील.

१) सन्मानचिन्हे ट्रॉफी व तैल चित्र बनविणे निविदा ३०.०३.२०२४ रोजी पेण कार्यालयात संध्याकाळी ५ वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत
२) सन्मानचिन्हे ट्रॉफी व तैलचित्र स्वतंत्र वेगळे कोटेशन असावे
३) कोटेशन मंजूर धारकांना कोणत्याही प्रकारे ॲडव्हान्स अगर रोख रक्कम अदा केली जाणार नाही बील चेकने स्विकारावे लागेल
४)कोटेशन मंजूर नामंजूर करण्याचा अधिकार व्यवस्थापक मंडळाने राखून ठेवलेला आहे
५)निविदा नामंजूर धारकांना कोणत्याही प्रकारे कळविले जाणार नाही
६) सन्मानचिन्हे व ट्रॉफी ची वेगळी किंमत कोटेशन मध्ये नमूद करावी बील जी.एस.टी.असावे
७) सन्मानचिन्हे व ट्रॉफी दि. ५/४/२०२४ रोजी पेण कार्यालयात पोहच कराव्या लागतील
८) तैलचित्र ३० जून पर्यंत पेण कार्यालयात तयार करुन दयावे लागेल तैलचित्राचे बील जी.एस.टी. असावे

ठिकाण पेण
दिनांक १९/३/२०२४

**श्री.नितीन वसंत वर्तक** — **सेक्रेटरी**
**श्री.अरविन्द बाळकृष्ण मोरे** — **व्हा.चेअरमन**
**श्री. रविन्द्र विनायक पाटील** — **चेअरमन**

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण रायगड**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे भादाव, ता. माणगाव, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरविले असून या मिळकतीबाबत आमचे अशिल व विद्यमान जमिन मालकांचे दरम्यान समंजस करारनामा झालेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध, बोजाविरहीत, निष्कलंक असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे मालकीहक्काबाबत शोध घेणेकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

| भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) | प्रकार | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | २ | अकृषिक-१८-२०-०० यापैकी श्री. पुरुषोत्तम विठोबा गावडे यांचे मालकीचे १०-३०-०० इतके क्षेत्र | १८२.०० | बिनशेती (अकृषिक) | श्री. पुरुषोत्तम विठोबा गावडे |

सदर जमिन मिळकत श्री. पुरुषोत्तम विठोबा गावडे यांच्या मालकीची असून सदर मिळकतीचे संदर्भात कोणताही गहाण, तारण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, भाडेपट्टा, निवाडा, साठेकरार, साठेखताचे खरेदीखत इतर कोणत्याही प्रकारे हक्क व वारसाहक्क हितसंबंध असल्याचे तसेच त्याची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्याची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार यांजकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचे खरेदीखत करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

याकरिता सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

दिनांक - १९-३-२०२४

सही/-
**ॲड. मोनिका नरेंद्र वाळंज-संसारे**
बी.ए.एलएल.एम.,
ऑफीस- ७७६, विद्यानगर, इंदापूर, ता. माणगाव
जि. रायगड फोन नं. ४०२ ११२
मो.नं.८६००९४४७६३

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत सदर मिळकतीचे विदयमान मालक श्री राजेश श्रीनिवास धामणेकर व सौ. रूची राजेश धामणेकर यांच्याकडून विकत घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विदयमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. सदर मिळकतीवरील विदयमान मालकांच्या मालकीहक्काची खातरजमा करणेकरीता आणि तसा दाखला देणेकरीता आमचे अशिलांनी विनंती केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे सहाण, ता. अलिबाग, जि.रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकारणी |
|---|---|---|
| ३०४ / ३९ | २-००-०० | २०-०० |

येणप्रमाणे वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखला जारी करण्यात येईल आणि आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक :- १८/०३/२०२४

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
गुरूकृपा, महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार **श्री. विनोद शंकर कराळे आणि श्री. दशरथ गंगाराम दळवी** यांनी मौजे. धामोते, ता, कर्जत, जि. रायगड येथिल मिळकतीचे मालक **श्री. जितेंद्र विठ्ठल पेरणे आणि श्री. अर्जुन विठ्ठल पेरणे** यांच्या सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १२८ | २१ | २१०-०० | २१-०० |
| १२८ | २२ | २१२-०० | २१-२० |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती हया निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक १९/०३/२०२४

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ कृपा हौसिंग
सोसायटी नेरळ, महेश टॉकीज जवळ, नेरळ
ता, कर्जत, जि. रायगड पिनकोड न. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

---


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, अर्जदार श्री.हनुमंत गोमा घुटे रा.पेंढारमाळ पो.घोटवडे, ता.सुधागड यांनी त्यांचे वडील कै.महादु गोमा घुटे रा.पेंढारमाळ ता.सुधागड यांचा मृत्यू दि.१८/०३/२००१ रोजी पेंढारमाळ ता.सुधागड येथे झाला आहे. परंतु त्यांची नोंद अद्यापर्यंत केली नाही असे नमुद करून तहसिल कार्यालय, सुधागड येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

सदरहू कै.महादू गोमा घुटे यांच्या मृत्युबाबत अगर मृत्यूच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकती दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यू नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

सदर नोटीस आज १४/०२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण : सुधागड पाली
दिनांक : १४/०२/२०२४

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहलिदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी **मौजे जांभिवली**, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकती, त्या मिळकतींचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| शैलजा सुरेंद्र कामत | ३५ | १ | १-६५-७० पैकी ०-५०-०० | ६-७२ |
| राहुल सुरेंद्र कामत | ३६ | ३ | १-०७-८० | १६-०७ |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०३/२०२४

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता.कर्जत,
जि.रायगड ४१०२०१.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की श्री.रंजीत गुरूनाथ पाटील रा.घर नं. २१४, जुनागाव रोड मराठी शाळे मागे, वेहेळे, भिवंडी ठाणे यांनी मौजे मळेघर श्री. स्वप्निल दत्तात्रेय पाटील व इतर यांच्या मालकीची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक | एकूण क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| मळेघर | श्री.स्वप्निल दत्तात्रेय पाटील व इतर | १५९ | ०.३२.१० | ७.५६ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ११ (अकरा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेल व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. १९/०३/२०२४

**श्री.रंजीत गुरूनाथ पाटील,**
रा.घर नं. २१४, जुनागाव रोड
मराठी शाळे मागे, वेहेळे,
भिवंडी ठाणे-४२१३११
मो.नं. ९८३३२२५५२७

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्धारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनकडून आमचे अशिल हयांनी कायमचे खरेदीखताद्धारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या गवतपड/राबपड जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- शेलु ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्र: हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| १. विरेंद्र आत्माराम साळूंखे,<br>२. विलास बारकू म्हात्रे, | ९७/४ | एकुण क्षेत्र:-०-२३-०० | २.६९ |
| १. विरेंद्र आत्माराम साळूंखे,<br>२. विलास बारकू म्हात्रे, | ९८/६ | एकुण क्षेत्र :-०-०६-१० | ०.७२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : लक्ष्मी अपार्टमेंट,
सदनिका कं. १०८ पहिला मजला,
शेलु स्टेशन जवळ (पु), बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण : कर्जत

सही/-
**ॲड. सूर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक: १८/०३/२०२४
मो.नं. ९९२२१५५१५३

निवडक

## पाकला प्रशिक्षक मिळेना

**लाहोर :** ऑस्ट्रेलियाचा माजी अष्टपैलू खेळाडू शेन वॉटसन पाकिस्तानचा मुख्य प्रशिक्षक होण्याच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. यासोबत वेस्ट इंडिजचा डॅरेन सॅमी यांनी पाकिस्तानचे मुख्य प्रशिक्षक बनण्याची ऑफर नाकारली आहे. त्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचा परदेशी कोचचा शोध अजूनही पूर्ण झालेला नाही.वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार डॅरेन सॅमीने पीसीबीला सांगितले की, मर्यादित षटकांच्या संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून तो आधीच वेस्ट इंडिज बोर्डाशी करारबद्ध आहे.

## डेव्हिडने आणली पैठणी

**मुंबई :** होम मिनिस्टरची भुरळ मुंबई इंडियन्सलाही पडली आहे. मुंबई इंडियन्सही होम मिनिस्टरची फॅन झाली आहे. मुंबई इंडियन्सने टिम डेव्हिडचं खास अंदाजात स्वागत केलं आहे. शीर्षक गीत वापरुन त्यांनी एक खास व्हिडिओ बनवला आहे. या व्हिडिओत डेव्हिडचा मराठमोळा अंदाज पाहायला मिळत आहे. हातात पैठणी घेऊन डेव्हिड दार उघड बये म्हणत एन्ट्री घेताना दिसत आहे. होम मिनिस्टर शोच्या शीर्षक गीताप्रमाणेच मुंबई इंडियन्सच्या व्हिडिओतही काही महिला दिसत आहे.

## पंतची योगामुळे झाली रिकव्हरी

**नवी दिल्ली :** जिम्नॅस्टिक खेळाडू असल्याची पार्श्वभूमी आणि मानसिकता सक्षमता यामुळे जीवघेण्या अपघातानंतरही पंतची रिकव्हरी अपेक्षेपेक्षा लवकर झाली, असे त्याच्यावर उपचार करणारे आणि तंदुरुस्तीसाठी मेहनत घेणाऱ्या सर्वांचे मत आहे.डिसेंबर २०२२ मध्ये पंतच्या गाडीला अतिशय भयावह अपघात झाला होता. त्यातून जिवंत बाहेर येणे हे त्याच्यासाठी पुनर्जन्म सारखेच आहे. १५ महिन्यानंतर तो क्रिकेटच्या मैदानावर पुन्हा परतत आहे.

## श्रेयस शिबिरात सामील

**कोलकाता :** नाइट रायडर्सचा कर्णधार श्रेयस अय्यर कोलकाता येथे पोहोचला असून तो संघात सामील झाला आहे. अय्यरचे कोलकाता येथे आगमन होताच हॉटेलमध्ये त्याचे स्वागत करण्यात आले. कोलकाता नाइट रायडर्सन; श्रेयस अय्यरचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. यापूर्वी अय्यरचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. हा व्हिडिओ मुंबई विमानतळाचा आहे, जिथे अय्यरचे पालक त्याला विमानतळावर सोडण्यासाठी आले होते. यानंतर अय्यर कोलकात्याला रवाना झाला.

## भाऊ काणे यांचे निधन

**नागपूर :** ॲथलेटिक्स प्रशिक्षक संजय उर्फ भाऊ काणे यांचं हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांनी वयाच्या ७५व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. भाऊ काणे यांनी आपले आयुष्य क्रीडाक्षेत्रासाठी वेचले. त्यांनी ॲथलेटिक्स प्रशिक्षणाला पूर्ण वेळ देता यावा म्हणून स्टेट बँकेतून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली होती. काणे यांनी नागपूरमधून ११ आंतरराष्ट्रीय ॲथलिट्स घडवले. चारुलता नायगावकर, अपर्णा भोयर आणि माधुरी गुरनुले या भाऊंच्या शिष्यांनी ॲथलेटिक्समध्ये नागपूरचं नाव मोठे केले.

## महिला प्रीमियर लीग चषक

# बंगळुरू रॉयल चॅलेंजर्स विजेते



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**गेल्या १६ वर्षांपासून आयपीएलचे विजेतेपद पटकावण्याचे बंगळुरू रॉयल चॅलेंजर्सच्या चाहत्यांचे स्वप्न पूर्ण झाले. सांगलीच्या स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखाली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने महिला प्रीमियर लीग २०२४ चे विजेतेपद पटकावले. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या सामन्यात आरसीबीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. आरसीबीने दिल्ली कॅपिटल्सचा ८ गडी राखून पराभव करून विजेतेपदावर नाव कोरले. या सामन्यात आरसीबीसमोर ११४ धावांचे लक्ष्य होते, जे २ गडी गमावून केवळ १९.३ षटकात पूर्ण केले.**

### दुष्काळ संपला, आरसीबीचं स्वप्न पूर्ण!




संघाकडून एलिस पेरीने नाबाद ३५, सोफी डिव्हाईनने ३२ आणि स्मृती मंधानाने ३१ धावा केल्या.शिखा पांडे आणि मीनू मणी यांनी १-१बळी घेतला. डब्ल्यूपीएलचा हा दुसरा हंगाम होता, जो आरसीबीने जिंकला आहे. मुंबई इंडियन्स पहिल्या सत्रात चॅम्पियन ठरला. दोन्ही वेळा दिल्ली कॅपिटल्सला अंतिम फेरीत पराभवाचा सामना करावा लागला होता.

आयपीएलमध्ये आतापर्यंत १६ हंगाम झाले आहेत आणि आरसीबी पुरुष संघाने एकदाही विजेतेपद जिंकलेले नाही. अशावेळी महिला संघाने केलेल्या या कामगिरीने विराट कोहली आणि पुरुष संघावरील दडपण वाढणार आहे. या अंतिम सामन्यामध्ये नाणेफेक जिंकून दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर संपूर्ण संघ १८.३ षटकांत ११३ धावांवरच मर्यादित राहिला. दिल्लीसाठी शेफाली वर्माने २७ चेंडूत ४४ धावांची खेळी केली. तर कर्णधार मेग लॅनिंगने २३ धावा केल्या. आरसीबीकडून श्रेयंका पाटीलने ४ आणि सोफी मोलिनेक्सने ३ बळी घेतले.

या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात चांगली झाली होती. संघाने ७ षटकात एकही गडी न गमावता ६४ धावा केल्या होत्या. पण इथून फिरकीपटू सोफी मोलिनक्सने कहर केला आणि पहिल्या ४ चेंडूत ३ बळी घेत आरसीबीला पुन्हा सामन्यात परत आणले. शेफाली सीमारेषेवर झेलबाद झाली. यानंतर जेमिमाह रॉड्रिग्ज आणि ॲलिस कॅप्सी खाते न उघडता बाद झाल्या. सोफीने दोघांना त्रिफळाचित केले.



## ४७ किलो वजनी गटात अमृता भगतला सुवर्ण पदक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टींग असोसिएशनचे वतीने राज्यस्तरीय सिनियर आणि मास्टर्स पॉवर लिफ्टींग स्पर्धेत कर्जत तालुक्यातील अमृता ज्ञानेश्वर भगत हिने ४७ किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले. जगातील पॉवर लिफ्टींग स्पर्धेची अमृता ही उपविजेती आहे.

राज्य पॉवर लिफ्टींग असोसिएशनच्या वतीने कर्जत येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय येथे राज्यस्तरीय मास्टर्स आणि सिनियर पॉवर लिफ्टींग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पुरुष आणि महिला अशा दोन गटात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत कर्जत तालुक्यातील अमृता ज्ञानेश्वर भगत हिने ४७ किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले. जागतिक पॉवर लिफ्टींग स्पर्धेत उपविजेती ठरलेली अमृता ही या स्पर्धेचे आकर्षण होती. त्यानुसार तिने देखील आपल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूप्रमाणे कामगिरी करीत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या कामगिरी बदल सर्वत्र कौतुक होत आहे.

## मोरया ११ खांबने पटकावला गावदेवी चषक

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील गावदेवी बाहे यांच्या वतीने खेळविण्यात आलेल्या खांब विभागीय क्रिकेट स्पर्धेत मोरया ११ खांब संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम खेळ करून गावदेवी चषकावर आपले नाव कोरले.

खांब विभाग क्रिकेट असोसिएशनच्या सहयोगाने व गावदेवी बाहे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक जगदीश थिटे, ग्रा.पं.सदस्य रवींद्र राऊत, युवा कार्यकर्ते रुपेश बामुगडे, मनोज थिटे, परेश थिटे,सागर सकपाळ,रोशन मोरे आदींच्या



हस्ते करण्यात आले. क्रीडाप्रेमी नागरिकांचा सहभाग लाभलेल्या या स्पर्धेत गावदेवी नडवली संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले तर धाक्सुद चिल्हे संघाने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेत मालिकावीर रोशन कोंडे चिल्हे, उत्कृष्ट फलंदाज मंगेश राऊत, उत्कृष्ट गोलंदाज चेतन टवले यांना मनेश थिटे, राजेश माठल, राहुल थिटे, स्वप्नील चव्हाण, ओमकार थिटे, साहिल राऊत, रोहित थिटे, ज्ञानेश्वर देवकर आदींच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. दरम्यान बाळा भोईर, ज्ञानेश्वर भोईर, राजेश सुटे, श्याम लोखंडे, नरेंद्र माळी, नंदकुमार मरवडे, प्रवीण थिटे, कल्पेश पवार आदींनी उपस्थिती नोंदवून मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले. सर्व सामन्यांचे समावलोचन सुमित भोईर व प्रशांत भोईर यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी गावदेवी क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.

## इंडियन वेल्स ओपन टेनिस स्पर्धा

# अंतिम सामन्यात अल्कारेज भिडणार मेदवेदेवशी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

इंडियन वेल्स ओपन ही टेनिस स्पर्धा सध्या चालू असून पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात २० वर्षीय अल्कारेजने इटलीच्या यानिक सिनरला पराभवाचा धक्का दिला. यासह स्पेनचा अल्कारेज अंतिम सामन्यात पोहचला आहे.उपांत्य सामन्यात अल्कारेजने पहिला सेट अत्यंत वाईटरित्या पराभूत झाल्यानंतरही दणक्यात पुनरागमन केले आणि पुढील दोन्ही सेट जिंकून अंतिम सामन्यातील प्रवेश निश्चित केला.

अल्कारेजने १-६, ६-३, ६-२ अशा फरकाने सिनरला पराभूत केले.यासह सिनरची सलग १९ विजयांची मालिका खंडीत झाली. त्याचबरोबर २०२४ वर्षात सलग १६ विजयांनंतर सिनर पराभूत झाला आहे. सिनरने २०२४



ऑस्ट्रेलियन ओपनचे विजेतेपदही जानेवारीमध्ये जिंकले होते.

या विजयामुळे अल्कारेजने क्रमवारीतील दुसरे स्थानही निश्चित केले आहे. तसेच अल्कारेज आणि सिनर हे दोघे आत्तापर्यंत ८ वेळा आमने-सामने आले असून आता प्रत्येकी ४ विजयांसह बरोबरी झाली आहे. सामन्यानंतर अल्कारेजने म्हटले की यासारख्या सामन्यात, जेव्हा एक सेट पराभूत झालेला असताना मानसिकरित्या कणखर राहणे महत्त्वाचे होते.

विशेष म्हणजे पहिला सेट चालू असताना पावसामुळे जवळपास ३ तास हा सामना थांबवावा लागला होता. आता अंतिम सामन्यात अल्कारेजचा सामना डॅनिल मेदवेदेवविरुद्ध होणार आहे. मेदवेदेवने उपांत्य सामन्यात अमेरिकेच्या टॉमी पॉलला १-६, ७-६(३), ६-२ अशा फरकाने पराभूत केले आहे. अल्कारेज आणि मेदवेदेव यांच्यातील अंतिम सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री अडीचनंतर सुरु होणार आहे. महिलांच्या अंतिम सामन्यात पोलंडच्या अव्वल मानांकित इगा स्वियातेक आणि ९ व्या मानांकित ग्रीसच्या मारिया साकारीने प्रवेश केला आहे.

## श्री जननी सोमजाई चषक क्रिकेट स्पर्धा

# सोमजाई क्रिकेट क्लब भेलोशी संघाची बाजी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ओम गणेश सेवा मंडळ खुटील मुळगांव ग्रामस्थ मुंबई पुणे आणि ओम गणेश युवा मंडळ यांच्या सहकार्याने श्री जननी सोमजाई फायटर्स खुटील मुळगांव यांच्या संयुक्त विद्यमानाने श्री जननी सोमजाई चषक २०२४चे खारघर नवी मुंबई येथे द्वितीय वर्षाचे आयोजन करण्यात आले.



गावदेवी प्रसन्न श्री जननी सोमजाई मातेला नारळ अर्पण करून, मैदानांमध्ये श्रीफळ वाढवून, श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण अभिवादन करून क्रिकेट स्पर्धा कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मंडळातील ज्येष्ठ सल्लागार सुरेश मोरे, मुंबईचे सल्लागार विनायक धाडवे, सहसंपर्क प्रमुख एकनाथ सुकुम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी अनेक सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी या स्पर्धेदरम्यान सदिच्छा भेटी दिल्या. यावेळी आयोजकांकडून पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.

खाडीपट्टा टेनिस क्रिकेट असोसिएशनमध्ये नोंदणीकृत झालेल्या ३२ नामवंत संघांनी क्रिकेट स्पर्धेला सहभाग नोंदविला होता. यामध्ये विजेता संघ सोमजाई क्रिकेट क्लब भेलोशी अ संघ, उपविजेता शिवतेज आंबवली, तृतीय क्रमांक सोन भैरीदेवी क्रिकेट संघ तेलंगे (अ),चतुर्थ क्रमांक वामने संघ यांनी श्री जननी सोमजाई चषक २०२४ या चषकावर नाव कोरल. तसेच तेलंगे संघाचा अनिकेत चव्हाण यांनी उत्कृष्ट फलंदाज तर शिवतेज आंबवली संघाचा नागेश रेवाळे यांनी उत्कृष्ट गोलंदाज किताब पटकावला तर मालिकावीर किताब भेलोशी संघाचा संकेत यादव यांनी पटकावला. या स्पर्धेचे आयोजन यशस्वी पार पाडण्यासाठी सर्व सदस्यांनीं उपस्थित राहून प्रंचड मेहनत घेतली.

## भारती विद्यापीठ-ब्रिक स्कूलमध्ये लढत

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन स्पोर्ट्स लीग शिअरफोर्स स्पर्धेत भारती विद्यापीठ डीम्ड युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि ब्रिक स्कूल ऑफ आर्किटेक्चर यांच्यात मुलांच्या गटाची फुटबॉल स्पर्धेची अंतिम लढत रंगणार आहे.

वानवडी येथील एस.आर. पी.एफ.च्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धे तील मुलांच्या गटाच्या फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारती



विद्यापीठने कोल्हापूरच्या डी.वाय. पी.सी.ई.टी. संघावर २-१ने मात केली. यात आर्यासेन काळेने दहाव्या मिनिटाला गोल करून कोल्हापूरच्या संघाला आघाडी मिळवून दिली होती. मात्र, दीपक कश्यप (१२ मि.) आणि स्वराज माने (१७ मि.) यांनी प्रत्येकी एक गोल करून भारती विद्यापीठला विजयी केले. दुसऱ्या उपांत्य लढतीत अंश अग्रवालच्या (३, १५ मि.) दोन गोलच्या जोरावर ब्रिक स्कूल ऑफ आर्किटेक्चर संघाने आकुर्डीच्या डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चर संघावर २-० ने मात केली.

## ३३वी कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राची बाद फेरीत धडक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राच्या मुलांनी साखळी सामन्यात सलग दोन विजय मिळवीत ३३व्या किशोर गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेच्या बाद फेरीत धडक दिली. मोतीहारी, बिहार येथे सुरू झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत उशीरा झालेल्या क गटात महाराष्ट्राने प्रथम गुजरातला ४१-२४ असे पराभूत करीत विजयी सलामी दिली. विश्रांतीला २१-१४ अशी छोटी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने विश्रांती नंतर आपला खेळ थोडा गतिमान करीत १७ गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला. संघनायक सोपान पुणेकरच्या झंझावाती चढाया



त्याला रवींद्र माने याची पकडीची मिळालेली भक्कम साथ यामुळे हा विजय शक्य झाला.

आज सकाळी झालेल्या शेवटच्या साखळी सामन्यात महाराष्ट्राने दुबळ्या त्रिपुराला २७-०४ असे सहज नमवित बाद फेरी गाठली. महाराष्ट्राच्या या क गटात फक्त ३ संघाचा समावेश होता. पहिल्या डावात १५-०१अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने दुसऱ्या डावात सावध खेळ करीत आपला विजय सोपा केला. अथर्व सोनावणे याच्या दमदार चढाया, सूरज झगडेचा भक्कम बचाव यामुळे हे शक्य झाले. उप उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राची गाठ आता 'फ' गटातील उपविजेत्या संघाशी पडेल.

# लक्ष्य करंडक नेमबाजीत हिमांशू विजेता

**। पनवेल। प्रतिनिधी ।**

**आर्मी मार्कमनशिप युनिटच्या हिमांशू तलान याने लक्ष्य करंडक नेमबाजी स्पर्धेत वरिष्ठ गटाचे विजेतेपद मिमळवले. ही स्पर्धा पनवेल येथील कर्नाळा स्पोर्टस अकादमी येथे पार पडली. तलान याने २५१.२ गुण मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले. त्याने विजेतेपद मिळवताना महाराष्ट्राच्या मोहित गोवडा (२४९.०) याला मागे टाकले. अंतिम शर्यतीत तलानची सुरुवात सावध होती. तो पहिल्या पाच शॉटमध्ये अव्वल तिघांमध्येही नव्हता.**



मात्र पाच सेटच्या दुसऱ्या शॉटमध्ये त्याने दुसऱ्या क्रमांकावर मुसंडी मारली.पहिल्या एलिमिनेशन राऊंडमध्ये पहिले स्थान मिळवले. त्याने १६ आणि १७ व्या शॉटमध्ये अचूक १० गुणांची कमाई केली. या लक्ष्य करंडक स्पर्धेत प्रथमच सहभागी झालेल्या तलानने विजेतेपदाच्या दीड लाख बक्षिसाची कमाई केली.

**निकाल**

**वरिष्ठ विभाग**

**सुवर्ण : हिमांशू तलान (आर्मी) २५१.२**
**रौप्य : मोहित गोवडा (महाराष्ट्र) २४९.०**
**कांस्य : गुरजंत सिंग (आर्मी) २२८.२)**

**कनिष्ठ विभाग**

**सुवर्ण : ओजस्वी ठाकूर (पंजाब) २५२.०**
**रौप्य : तलवाल सिंग (हरियाना) २५१.५**
**कांस्य : अजय मलिक (नौदन) २२९.८**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)